# टॅटू

अंकिता शामराव शिंदे



# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# टॅटू

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# टॅटू

# अंकिता शामराव शिंदे

टॅटू

लेखिका : कु. अंकिता शामराव शिंदे.
Contact no. – 7507043149.
Address – A/P Palashi, Tal – Khandala,
Dist – Satara, pincode - 412801.
Email Id - ankitashinde191@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction. damages and accounts

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com

प्रकाशन : 7 जुलै २०२१

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**कु. अंकिता शामराव शिंदे.**

शिक्षण – BSC in chemistry.

Contact no. – 7507043149.

Address – A/P Palashi, Tal – Khandala, Dist – Satara, pincode - 412801.

Email Id - ankitashinde191@gmail.com



वाचनाची आवड मला मी शाळेत असताना लागली. पुस्तक वाचत असताना मी कधी त्या पुस्तकातील कथेचा एक भाग होऊन जाते हे मला देखिल समजत नाही. मग एकदा वाचायला घेतलेल पुस्तक पुर्ण वाचल्याशिवाय चैन पडत नाही. मग ते पुस्तक कोणत्याही प्रकारचे असो. पण त्यातल्या त्यात माझा कल हा कथा, कादंबरी याकडेच जास्त असतो.

टॅटू ही मी लिहिलेली पहिली कथा. हे माझ पहिलं पाऊल जे मी या क्षेत्रात टाकलं आहे. त्यामुळे तुम्हा वाचकांच्या प्रतिक्रियेची नक्कीच वाट पाहिन. याकथेच्या बांधणीमध्ये सुनील सामंत सरांनी केलेल्या अमुल्य मार्गदर्शनासाठी त्यांचे आभार आणि ई साहित्य प्रतिष्ठानचे सुद्धा मनापासुन आभार त्यांच्यामुळे माझी कथा एका पुस्तकाच्या रुपात वाचकांपर्यंत पोहचु शकली.

अर्पणपत्रिका

मी लिहिलेली पहिली कथा, ही माझ्यासाठी खुप स्पेशल
आहे आणि म्हणुनच मी ही कथा
माझ्या आयुष्यात असणाऱ्या स्पेशल माणसांना
म्हणजेच
माझ्या फॅमिलीला अर्पण करत आहे.

# टॅटू

या कथेतील सर्व नावे, घटना, स्थळे व संस्था काल्पनिक असून त्यांचा प्रत्यक्ष घटना, संस्था किंवा व्यक्तींशी साम्य आढळल्यास तो निव्वळ योगायोग समजावा.

"पप्पा... पप्पा... सांगा ना तुमच्या हातावर हा टॅटू का आहे." असं म्हणत १० वर्षांचा सोहम घरभर पप्पांच्या मागे फिरत असतो.

"मम्मी तू तरी सांग ना, तुझ्यापण हातावर आहे आणि आजोबांच्या हातावर सुद्धा आहे."

"अरे बाळा सांगितलं न तुला आपल्या घराण्याची परंपरा आहे म्हणून काढला आहे हा टॅटू..." मम्मी.

"कसली परंपरा...? आणि हे चक्रच का...? सांगा ना पप्पा..."

"पहिलं तर ते चक्र नाही सुदर्शनचक्र आहे आणि बाकीचं तुला मी ऑफिसमधून आल्यावर नक्की सांगेन." पप्पा.

"नाही तुम्ही विसरता."

“आज नक्की सांगेन, पण मी येईपर्यंत जागा राहशील?.”

“हो.”

सोहम हा अशोक आणि माधुरी राजवाडेंचा १० वर्षांचा एकुलता एक मुलगा... दिसायला गुटगुटीत बघताक्षणी गाल ओढावे असा वाटणारा, पण तेवढाच चाणाक्ष म्हणूनच सतत प्रश्न विचारून समोरच्याला भंडाऊन सोडणारा.

सोहमने त्याला कळायला लागल्यापासून त्याच्या पूर्ण फॅमिलीच्या हातावर एक प्रकारचं चक्र असलेला टॅटू बघितलेला असतो. त्याला त्याच्या मागची गोष्ट ऐकायची असते पण नेहमीच त्याचे घरचे हा प्रश्न टाळत होते. पण आज काही झाले तरी त्या टॅटू मागची गोष्ट ऐकायचीच असा प्रणच त्याने केला होता...

रात्री उशिरा,

“सोहम बाळा झोप, पप्पा आत्ताच आलेत ना कामावरून, जेवून झोपुदे त्यांना, तुला गोष्ट नंतर सांगतील ते...”

“नाही... मला आज गोष्ट ऐकायचीच आहे” असं म्हणून रूसून त्याच्या रूममध्ये जाऊन बसला.

जेवण झाल्यानंतर सोहमचे पप्पा त्याच्या रूममध्ये जावून त्याच्या शेजारी बेडवर बसले. “रूसलं माझं पिल्लु” त्याला जवळ घेतलं. “चल आज तुला एक गोष्ट सांगतो”

“गोष्ट नाही...मला टॅटू बद्दल सांगा.”

“बरं बाबा ... तुला टॅटूची गोष्ट सांगतो.”

सोहमने लगेच मांडी घातली आणि गोष्ट ऐकायला तयार झाला, “सांगा.”

“तर गोष्टीचं नाव आहे... काय बरं नाव आहे...सोहम?”

सोहम मोठ्याने बोलला... “... टॅटू ...”

“तर ऐक सोहम, ही गोष्ट आहे खूप खूप वर्षांपूर्वीची ...जेव्हा आपल्या देशातच काय पण पूर्ण जगात राजेशाही राज्यव्यवस्था होती...

त्या काळात राजा हाच राज्याचं सर्वस्व, तो म्हणेल तिच पूर्व दिशा... त्यामुळे बरेच राजे हे स्वतःला देव समजू लागले आणि भोळया भाबड्या जनतेची पिळवणूक करू लागले.

पण याउलट आपल्या देशात अशी दोन राज्ये होती जिथले राजे हे स्वतःला राज्याचा पालक आणि प्रजेला आपल्या पाल्यासारखा समजत... आणि त्यांची काळजी देखील घेत त्यांना काय हवं नको ते पाही... आणि त्यामुळेच तिथली प्रजा देखील राजावर अतोनात प्रेम करी...

ती दोन राज्ये तशी आकारमानाने बाकी राज्यांपेक्षा छोटीच होती, अगदी एखाद्या छोट्या शहरासारखी पण खूप सुंदर होती, त्यांच्या चारही बाजुने ही मोठ मोठी जंगलं... जंगलाच्या वरच्या बाजुला म्हणजे उत्तरेला मोठी डोंगर रांग होती... तर पूर्व पश्चिम दिशेला बारामाही वाहणाऱ्या दोन नद्या ... याच नद्या दक्षिणेला

जाऊन एकमेकांना मिळत...निसर्गाने ही भूमी खूप छान रंगवली होती... खुपच सुंदर... हिरवी हिरवी झाड... नदीचं निळशार पाणी... जंगलात रंगबिरंगी फुले... जंगलाला जिवंतपणा तर त्यात राहणारे प्राणी देत होते... जणू भगवान श्रीकृष्णाच वृंदावनच...

ही दैवी संपत्ती तर तेथे राहणाऱ्या लोकांनी आणि त्यांच्या राजांनी जपली होती. राजाचा राजवाडा खूप मोठा होताच पण इथल्या प्रजेची घरे ही राजवाड्यापेक्षा कमी नव्हती... इथे पैशाची काहीच कमी नव्हती... कारण कोणालाही आपल्याला जे मिळतंय त्याच्यापेक्षा जास्त हवं याची हाव नव्हती...

या लोकांची यांच्या कुलदैवतावर खूप श्रद्धा होती... खूप विश्वास होता. यांचा विश्वास होता की जोपर्यंत यांच्या कुलदैवताचा हात यांच्या डोक्यावर आहे तोपर्यंत यांना कधीच कशाचीच कमी पडणार नाही...

म्हणूनच त्यांनी त्यांच्या राज्यांची नावे ही त्यांच्या कुलदैवतेच्या नावावरून ठेवली होती म्हणजे एकाच कुलदैवत भगवान शिवशंकर म्हणून त्याच्या राज्याचं नाव शिवनगरी आणि

दुसऱ्याचं कुलदैवत भगवान विष्णु म्हणून त्याच्या राज्याचं नाव विष्णुनगरी...

अशा निसर्गाने सजलेल्या भूमीला या दोन राज्यांनी एक भलीमोठी भिंत बांधून गालबोट लावल होतं.

ही भिंत या दोन राज्यांना एकमेकांपासून वेगळी करत होती. ही भिंत त्यांच्यातल्या दुश्मनी चे प्रतीक होती.

मध्येच सोहमने त्याला थांबवलं, "कसली दुश्मनी पप्पा...?"

"हे बघ तू मधे-मधे बोलणार असशील तर मी गोष्ट नाही सांगणार"

"मी नाही बोलणार मध्ये तुम्ही सांगाना... प्लिज..."

"दुश्मनीचे खरं कारण हे त्यांनाही माहीत नव्हतं... वडिलांकडून मुलाला जशी जमीन, घर, संपत्ती मिळते तशी ही दुश्मनी ही त्यांना मिळाली.

ही राज्ये दुसऱ्या कोणत्याच राज्यांवर आक्रमणं न करता एकमेकांवर आक्रमणं करत.

याचा फायदा घेत आजुबाजुच्या राज्यांचे राजे या राज्यांवर आक्रमणं करू लागली. पण अशा वेळेस त्यांनी एकत्र येऊन ती धुडकाऊन लावली. कारण पर्याय नव्हता ही दोन्हीही राज्ये एकमेकाशेजारी होती, आणि जर आपल्या राज्याला वाचवायचं असेल तर त्यांना एकमेकांना मदत करणं भाग होतं.

आणि त्यांच्या एक गोष्ट लक्षात आली की आधी आपण आपली राज्ये सुरक्षीत केली पाहिजे.

मग त्यांनी तीन सुरक्षाचक्रांत त्यांची राज्ये सुरक्षीत केली. पहिलं सुरक्षा चक्र म्हणजे राज्यांच्या एका बाजुला मोठमोठ्या पर्वतरांगा होत्या तर दोन्ही बाजुला बाराही महिने वाहणाऱ्या दोन नद्या होत्या. त्या दोन्हीही नद्या एकमेकांना अशा मिळत की तिसरी बाजुही सुरक्षीत होत होती.

पण तरीही आक्रमणे होत होती. म्हणून मग दुसरं सुरक्षा चक्र तयार करण्यात आलं ते म्हणजे त्यांनी त्यांच्या राज्याचा चारही बाजुने खूप झाडे लावली इतकी की काही वर्षांत तेथे जंगल तयार झालं. त्या जंगलात आदिवासी लोकांच्या रूपात ट्रेन केलेली सैनिक वस्ती करून राहू लागले जर कोणी अनोळखी माणसे दिसली तर काहीही विचारपूस न करता त्यांना सरळ मारून टाकत.

या दोन्हीही चक्रातून वाचणं अशक्य. आणि तरीही जर आलेच तर तिसरं आणि शेवटचं चक्र म्हणजे सीमारक्षक.

जेव्हा त्यांना वाटलं आपण पूर्णपणे सुरक्षीत आहोत. तेव्हा त्यांनी पुन्हा एकमेकांवर आक्रमणं करायला सुरुवात केली.

त्यात काही वर्षांनी जाणवलं की यात दोन्ही राज्यांच खूप नुकसान होत होतं. सततच्या लढायामुळे कितीतरी लोक मरत होते. नगरात लहान मुलांच्या हसण्या, खेळण्याचे कमी रडण्याचे आवाज जास्त ऐकू येत होते. तरूण पिढी तर दिसेनाशी व्हायला लागली. म्हणून या सर्व गोष्टींवर कुठेतरी नियंत्रण असणं गरजेच होतं.

शेवटी दोन्ही राज्यांचे राजे, लोक आणि मंत्री यांच्यात बैठक झाली, त्यात एक करार झाला तो असा,

- ह्या ज्या सतत होणाऱ्या लढाया बंद होतील.
- दर २५ वर्षांनी एक संधी मिळेल युद्ध करण्यासाठी त्यात जो विजयी होईल तो दोन्ही राज्यांचा राजा होईल.

- या युद्धासाठी वेळ फक्त एक महिना असेल. मराठी वर्षातल्या पहिल्या म्हणजे चैत्र महिन्यातल्या १ तारखेला सुरू झालेलं युद्ध ३० तारखेलाच संपेल. त्यात जो निकाल लागेल तोच अंतिम निर्णय असेल. जर कोणतेही एक राज्य दुसऱ्या राज्याला हरवू शकलं नाही तर तिथून पुढे २५ वर्ष ते आपापल्या राज्यांचा कारभार पाहू शकतील.
- आणि सगळ्यात महत्त्वाचं या दोन्ही लढायांच्या दरम्यान कोणी कोणाच्याच राज्यकारभारात हस्तक्षेप करणार नाही.

खरंतर एक महिना हा कालावधी खुपच कमी होता युद्धासाठी, त्यामुळेच की काय वर्ष जात होती पण युद्ध कोणतेही राज्य जिंकत नव्हतं...

दोन्ही राज्यांत नियमांचे पालन काटेकोरपणे केले जात होतं. दोन्ही राज्यांचे लोक धर्माने वागणारे होते, पण अंधश्रद्धाळू नव्हते.

पुराणात वाचल्याप्रमाणे त्यांचा खूप मोठा गैरसमज होता की कलियुग येईल आणि सर्व काही संपून जाईल. म्हणून ते बाहेरील जगात होणारे बदल स्विकारत नव्हते.

विष्णुनगरीच्या लोकांनी शिवनगरीचे लोकं आपल्या राज्यात येऊ नयेत आणि आलेच तर राहू नयेत आणि जर राहिलेच तर

आपल्या लोकांना त्यांना ओळखता यावे म्हणून एक वेगळीच युक्ती शोधून काढली ती म्हणजे गोंदने... म्हणजे टॅटू काढणे...

कोणता तर आपलं दैवत यांच्या हातातील शस्त्र सुदर्शनचक्र संगळयांनी आपापल्या हातावर गोंदवून घेतलं... राजाने देखील.

असंच शिवनगरीच्या लोकांनी देखील केलं. लोकांच्या हातावर त्यांच्या देवाचं शस्त्र त्रिशूळ गोंदवून घेतलं.

त्यांनी त्यांच्या हातावर काढलेले टॅटू हे कधी त्यांच्या राज्याचं राज्यचिन्ह बनलं हे त्यांना ही समजलं नाही. कधी कधी लोकं राज्याबाहेर जात आणि परत येताना त्यांना तपासले जाई राज्यचिन्ह म्हणजे टॅटू असल्याशिवाय प्रवेश नाही. आणि तेच राजचिन्ह कधी त्याच मानचिन्ह बनलं हे त्यांना कळलच नाही.

शिवनगरी आणि विष्णुनगरीमधली लोकं चांगली होती पण एकमेकांसाठी ते दैत्य रूप घेत होती. त्यांच्या मनात एकमेकांबद्दल जराही प्रेम नव्हतं. याचं कारण देखील त्यांना माहीत नव्हतं पण मागची पिढी नवीन पिढीला जे काही सांगायची तेच ते मानत होते.

त्या करारानंतर खूप युद्ध झाले पण कोणीही जिंकू शकल नाही. कारण तो कालावधी खुपच कमी होता कोणालाही जिंकण्यासाठी किंवा हरवण्यासाठी.

बाहेरील देशात लोकशाही राज्यव्यवस्था आली देखील पण येथे अजूनही युद्धांचा खेळ चालू होता.

बाहेरील राज्यांना अशी दोन राज्ये आहेत हे माहिती देखील नव्हतं. त्यांच्यासाठी हा भाग म्हणजे फक्त जंगल.

पण शिवनगरी आणि विष्णुनगरी मधील लोकांना बाहेरची सगळी माहिती होती उलट काही लोकं तिथे जाऊन राहत होते पण आपली ओळख लपवून. यांना असं वाटायचं की लवकरच यांचा विनाश होणार आहे म्हणून बाहेरील जगातील कोणत्याच आधुनिक वस्तुंचा ते वापर करत नव्हते.

अजून एका युद्धाची सुरुवात होणार होती.

विष्णुनगरीचा राजा "सत्यजीत" यांनी युद्धाची पूर्ण तयारी केली होती. तशीच किंवा त्याहून अधिक तयारी शिवनगरीच्या राजा "भैरवसिंग" यांनी केली होती.

विष्णुनगरी मधील लोकं जास्त देव धर्म यांचे पालन करणारे होते. त्यामुळे युध्दाच्या आदल्या दिवशी यज्ञ झाला.

युद्धाची तयारी झाली होती. पण युद्धाच्या आदल्या रात्री राजा सत्यजीत यांना झोप लागत नव्हती. झोप लागणार तरी कशी

डोक्यावर एवढी मोठी जबाबदारी होती. बराच वेळ प्रयत्न करूनही झोप लागत नाही हे लक्षात येताच थोडा वेळ बाहेर फेरफटका मारून यावं असा विचार त्यांनी केला आणि ते पलंगावरून उठून महालाबाहेर जाणार तेवढ्यात... मागून राणी लक्ष्मीबाईंचा आवाज आला...

"एवढ्या रात्रीचे कुठे चालला आहात..." या शब्दांमागची भीती राजांच्या लगेच लक्षात आली.

राजांनी त्यांच्यापाशी जाऊन त्यांचा हात हातात घेतला, "भीती वाटतं आहे का? काळजी करू नका, सगळं ठीक होईल."

राणी, "भीती... नाही फक्त थोडीशी काळजी वाटत आहे जर काही विपरीत.."

राणीला असं घाबरलेलं बघून राजांनी त्यांचं बोलणं मध्येच थांबवलं आणि म्हणाले, "शु... घाबरु नका तुम्हीच जर असे वागलात तर कसे होईल. तुम्ही आधी शांत व्हा आणि इथे बसा."

राजांनी राणीला पलंगावर बसवले, "आम्हाला तुमच्याशी एका महत्त्वाच्या विषयावर बोलायचे आहे... खरंतर तुमचं मत जाणून घ्यायचं आहे." राजांच्या आवाजावरून नक्कीच गंभीर विषय आहे हे राणींच्या लक्षात आलं.

"हा बोलाना काय बोलायचं आहे..."

“मी सरळच विचारतो, युद्ध चालू असताना जर तुम्हाला समजलं की आमचे प्राण गेले आहेत तर त्या नंतर तुम्ही काय कराल.”

हे ऐकताच राणी ताडकन उभ्या राहिल्या, “हे असं अभद्र का बोलताय तुम्ही.”

“असं झालं तर काय कराल तुम्ही आधी आम्हाला ते सांगा.”

राणीने एका क्षणाचाही विचार न करता उत्तर दिले, “मी माझे प्राण सोडेल.”

त्यांनी असं उत्तर देताच राजांनी त्यांचा हात पकडला आणि त्यांना त्यांच्या महालाबाहेर राजकण्येच्या महालात घेऊन गेले, तेथे चार वर्षांची ती छोटी राजकन्या अगदी गाढ झोपेत होती. तिला पाहून राजाचं मन गहिवरून आलं, “ आम्ही युद्ध करणं हे आमचं कर्तव्य आहे, त्यात आमचं काही बरवाईट झालं तर ती आमची नियती आहे... बघा आपल्या राजकन्येकडे यासगळ्यात त्यांची काय चूक आहे... त्यांच्या पिता तर त्यांना सोडून जाणार पण त्यांच्या मातेला त्यांच्यापासून दुर करण्याचा अधिकार तुम्हाला कोणी दिला... सांगा मला...”

नंतर त्यांनी त्यांना राजपुत्राच्या महालात नेलं. राजपुत्र एक नवजात बालक होतं त्यांनी त्याला हातात घेतले, “आपला पुत्र

फक्त तीन महिन्यांचा झाला आहे बघा किती निरागस चेहरा आहे आपल्या पुत्राचा, आम्ही गेल्यानंतर त्यांच रक्षण कोण करणार...” असं म्हणून त्यांनी राजकुमाराला पुन्हा पाळण्यात ठेवलं...

नंतर ते राणीला घेऊन राजमहालाच्या सर्वात वरच्या मजल्यावर गेले तेथून खाली पाहिल्यावर राज्याचा बराचसा भाग दिसत होता ... “बघा समोर आणि काय दिसतंय ते सांगा.”

“आपल्या राज्यातील लोकांची घरे...”

“काय करत आहेत ते...?”

“परंपरेनुसार युद्धाच्या आदल्या दिवशी सगळी प्रजा दिवाळी साजरी करते म्हणजे घराबाहेर दिवे लावणे, गोडधोड करणे, संपूर्ण दिवस आनंदात घालवणे...”

“का...?”

“कारण युद्धात जर हारलो तर ती आपल्या लोकांसोबत घालवलेली शेवटची आठवण म्हणून...”

“आता मला सांगा जर युद्धाच्यामध्येच आमचा मृत्यू झाला तर तुम्ही, आपल्या मुलांना, आपल्या प्रजेला असंच दुष्मणाच्या हवाली करणार तुमचा पत्नी धर्म पाळण्यासाठी...”

राणीने स्वतःला सावरले, डोळे पुसले आणि मग त्या बोलल्या, ”पण तुम्ही असा का विचार करताय की जसं तुम्हाला माहीत आहे की तुमचा जीव जाणार आहे.”

राजा, “होऽऽ कारण असंच होणार आहे.”

राणी आश्चर्य चकित होते, “तुम्ही माझ्यापासून काहीतरी लपवत आहात मला आधी सांगा काय झालं आहे.”

राजा, “आपल्या गुप्तहेराने सांगितले आहे की,

भैरवसिंग त्याच्या महालात त्यांच्या मंत्र्यांना सांगत होता,

”आम्ही असं काहीतरी नियोजन केले आहे की आपला विजय निश्चित आहे तुम्ही काही काळजी करू नका, उत्सवाची तयारी करा.”

भैरवसिंगचा एक मंत्री, “राजा सत्यजीत असताना आपल्याला विजय मिळणं सहज शक्य नाही महाराज”

भैरवसिंग, “राजा सत्यजीत जिवंत राहिला तर तो काही करेल...” हे बोलताना त्याचा चेहरा असुरी आनंदाने चमकत होता.

थोड्यावेळासाठी सगळे मंत्री गप्प झाले होते.

तोच मंत्री पुन्हा बोलला, “ते कसं काय महाराज...?”

भैरवसिंग, “ते सगळं मी बघतो तुम्ही युद्धाची तयारी करा... आत्ता मी फक्त एवढंच सांगेन की तो आपला विजय बघण्यासाठी जिवंत राहणार नाही.”

राजा सत्यजीत, “या सगळ्याचा अर्थ एकच होतो. आणि तो काय हे तुम्हाला सांगायची गरज वाटत नाही...”

राणी, “नक्की काय करणार आहे ते समजले का ?”

“नाही तसं काहीही समजलं नाही पण जे काही आहे ते आपल्यासाठी चांगले नाही.” राजा.

राणी, “आपण पंचांची मदत घ्यायची का?”

( पंच म्हणजे युद्धाचे काही नियम असतात ते मोडले जाऊ नयेत म्हणून दोन्ही राज्यांतील लोकांची समिती )

“आपण असं नाही करू शकत कारण आपल्याला पूर्ण काहीच माहिती नाही आणि पुरावा देखील नाही. पुरावा नसताना जर आपण त्यांची तक्रार केली तर त्यांच काही बिघडणार नाही पण आपल्या गुप्तहेरांच्या जीवाला धोका निर्माण होईल.” राजा.

थोड्यावेळ कोणीही काहीही बोललं नाही दोघेही त्यांच्या महालात परत आले पण रात्रभर दोघांनाही झोप लागली नाही... लागणार तरी कशी मनं चलबिचल होत होती तर डोक्यात अनेक प्रश्नांनी काहूर माजवला होता... तरीही एकमेकांसाठी डोळे मिटून झोपण्याचा त्यांनी प्रयत्न केला...

थोड्यावेळातच सकाळ झाली, राणीसरकारांनी सेविकेला हाक मारली. "राजकुमारी उठून तयार झाल्या असतील तर त्यांना बोलावून घ्या आम्हाला बोलायचं आहे त्यांच्याशी."

"जशी आज्ञा राणीसरकार" असं म्हणून एक सेविका तेथून निघून गेली.

इकडे राजकुमारी रोहिणी त्यांच्या महालात उठून तयार होत होत्या त्यांच्या जवळ दोन सेविका उभ्या राहून त्यांना काय हवं नको ते बघत होत्या.

थोड्याच वेळात राणीने पाठवलेली सविका तेथे पोहोचली आणि महालाच्या दारातूनच खाली मान घालून बोलू लागली, "राणीसाहेबांचा हुकूम आहे राजकुमारींसाठी, त्यांना भेटायला बोलावलं आहे." असं म्हणून ती तिथून निघून गेली..

“मातोश्रींचा हुकूम आहे आम्हाला जायला पाहिजेत.” असं म्हणत ती छोटिशी राजकुमारी पायातल्या घुंगराचा छुमछुम आवाज करत पळत राणीच्या महालात पोहोचली...

पण तिथे त्यांना कोणीही दिसलं नाही मग तशाच त्या राजकुमार कृष्णाच्यामहाली गेल्या...

तिथे पोहोचताच त्यांना मातोश्री दिसल्या त्या पलंगावर बसून समोर असणाऱ्या राजकुमार कृष्णाच्या पाळण्याला झोका देत होत्या.

त्यांना बघताच राजकुमारीने त्यांना मिठी मारली.

राणीने त्यांचा हात आपल्या कंबरेतून सोडवून घेतला आणि त्यांना पलंगावर स्वत:च्या समोर बसवले आणि त्या म्हणाल्या, “जर आज आम्ही तुमच्यावर एखादी जबाबदारी टाकली तर ती पूर्ण कराल.”

“कसली जबाबदारी मातोश्री…?”

“आजपासून एक महिना होईपर्यंत म्हणजे १ तारखेपर्यंत तुम्ही तमची आणि तुमच्या छोट्या बंधुंची काळजी घ्यायची, घ्यालना... ?”

“हो मातोश्री पण का……?” राजकुमारीने काळजीच्या स्वरांत विचारले,

“कारण तुमच्या पिताश्रींने आमच्यावर सोपवलेली जबाबदारी आम्हाला पूर्ण करायची आहे...”

आणि राणीसाहेबांनी टाळी वाजवली तशी बाहेरून एक दासी आत आली तिला पाहून राणी बोलली, “आणि तुमची जबाबदारी पार पाडण्यात या तुमची मदत करतील.” असं म्हणून राणी तिथून निघून गेली. राजकुमारी रोहिणी मात्र विचार करत तिथेच थांबली...

राणी त्यांच्या महालात परत आली तोपर्यंत राजा सत्यजीत यांची युद्धाला जायची तयारी झाली होती...त्यांना तसं युद्धाच्या पोषाखात पाहून पुन्हा राणीच्या डोळ्यांतून अश्रु वहायला लागले...

“तुम्ही पुन्हा रडायला सुरुवात केली, असं पाठवणार आहात का आम्हाला युद्धाला...”

“नाही औक्षण केल्याशिवाय कसं पाठविलं तुम्हाला...”

तेवढ्यात बाहेर आलेल्या व्यक्तीला पाहून राजे बोलले, “अरे सेनापती... या आत या...”

सेनापती, “नमस्कार राजे, आपल्याला निघायला हवे.”

“हा... सेनापती चला आणि हो राणीसरकार काळजी करू नका...”

सेनापतींच लक्ष राणीकडे गेले त्यांना त्यांचा पडलेला चेहरा आणि त्यावरची काळजी दिसली, “राणीसाहेब तुम्ही आम्हाला तुमचा भाऊ मानता... या भावाचा शब्द आहे तुम्हाला, मी जिवंत असेपर्यंत तलवारीचं टोक सुद्धा लागू देणार नाही राजेंच्या अंगाला...”

ते शब्द ऐकून राणीला थोडा धीर आला कारण सेनापती होतेच तेवढे पराक्रमी, त्यांनी शब्द दिला म्हणजे त्यांची काळजी थोडी कमी झाली...

काळजी कमी झाली असली तरी त्या नेहमी कोणत्या ना कोणत्या तरी विचारात असायच्या... यामागचे कारण तर सर्वांनाच माहीत होते की त्यांना राजेंची काळजी होती...पण त्या आता जास्तीत जास्त वेळ महालामागच्या राजवाड्यात घालवत होत्या...याचे कारण कोणालाच माहित नव्हते आणि कोणी विचारायची हिंमत देखील करत नव्हते.........इकडे दिवसामागून दिवस जात होते, आणि राणीचं काय चाललं आहे हे कोणालाही कळत नव्हते.

युद्ध सुरू होऊन २० दिवस झाले.

युद्धाच्या एकविसाव्या दिवशी सकाळीच राजा सत्यजीत यांच्या मृत्यूची बातमी आली. मृत्यूचे कारण विचारले तर कळले की अन्नातून विषबाधा झाली. राणीने डोळयातून एकही थेंब न गाळता राज्यांचे अंतिम संस्कार केले त्यांना माहीत होते ती वेळ रडण्याची नव्हती...

महालात कसलातरी विचार करत येरझाऱ्या घालणाऱ्या राणीसमोर सेनापती मानखाली घालून उभे होते, "राणीसाहेब, माफ करा मला, आम्ही राजेंना नाही वाचवू शकलो, आम्ही आमचा शब्द पाळू शकलो नाही... तुम्ही देताल ती शिक्षा भोगायला मी तयार आहे."

"सेनापती ही वेळ याविषयी बोलायची नाही तर उद्याच्या होणाऱ्या युद्धाची युद्धनीती ठरवायची आहे... "

सेनापती, "पण राणीसाहेब राजेंच्या जाण्याने आपले सैनिक मनाने खचून गेले आहेत..."

"ते मी बघते तुम्ही माझ्यासोबत चला."

## युद्धभूमीवर

राणीसाहेब युद्धभूमीवर गेल्या आणि घाबरलेल्या सैनिकांसमोर तलवार हातात घेतली आणि युद्धासाठी त्यांना आवाहन केले, घाबरलेल्या सैनिकांनी आपापल्या तलवारी उगारून आवाहन स्विकारले.

त्यातील एक सुभेदार समोर आला, “राणीसाहेब माफ करा पण आपलं सैन्य खूप थोडं आहे आपण युद्ध कसं जिंकणार”

तेवढ्यात त्यांच लक्ष समोर गेले, समोरून खूप लोक हातात तलवारी घेऊन येत होते.

ते लोक जवळ येताच त्यांना कळतं ते लोक दुसरं तिसरं कोणी नसून त्यांच्याच राज्यातील तरुण मुली होत्या.

“राणीसाहेब माफ करा पण यांनी युद्ध केलेलं नाही चालणार आम्हाला...” असं म्हणून त्या माणसाने आपली मान खाली झुकवली. असं बोलणारे राज्याचे प्रधान होते.

राणी, “म्हणजे तुम्हीही असाच विचार करता प्रधानजी की मुलींनी घराबाहेर पडणे पाप आहे त्यांच फक्त एकच काम ते म्हणजे चुल आणि मुल... मला वाटलं नव्हतं माझी प्रजा इतक्या छोट्या विचारांची आहे.”

“नाही नाही राणीसाहेब तुम्ही चुकीचं समजताय..”

“म्हणजे...”

“यांनी युद्ध करणं आम्हाला यासाठी मान्य नाही कारण ... कारण येथे असणा-या एक एका सैनिकांच प्रशिक्षण हे ते लहान असल्यापासून झालेल आहे आणि या मुलींनी फक्त वीस दिवस प्रशिक्षण घेतलं आहे... यांचा युद्धात किती वेळ टिकाव लागणार आणि आमचं लक्ष शत्रुवर कमी यांच्या सुरक्षिततेवर जास्त राहणार...”

हो राणीसाहेब... हो राणीसाहेब... असा आवाज सैन्यातून येऊ लागला.

राणीने हातवर करताच सगळे शांत झाले.

राणी, “ठीक आहे असं असेल तर एक परीक्षा घेऊ.”

सेनापती, “कसली परीक्षा...”

“या मुलींपैकी ५ मुली आणि तुमच्यातील २५ मुलं तुम्ही म्हणताल ती इथे लढतील आणि त्यात जो निकाल लागेल तोच अंतिम निर्णय राहील... मान्य आहे...”

“मान्य आहे, मान्य आहे...” सैन्यातून आवाज येऊ लागला.

लढाई सुरू झाली सगळ्यांना वाटले मुले जिंकतील पण झालं उलटच मुलींकडे भलेही ताकद आणि अनुभव नव्हता पण चपळता आणि लवचिकता होती आणि त्याच जोरावर त्यांनी लढाई जिंकली आणि सगळ्यांची मने देखील.

शिवनगरीमध्ये राजा सत्यजीत मेला आता आपणच युद्ध जिंकणार म्हणून सगळेच खूप आनंदात होते. राजा त्याचे दोन भाऊ आणि त्याची प्रजासुद्धा.

दुसऱ्या दिवशी त्यांनी जेव्हा विष्णुनगरीच्या सैन्यदलात मुलींना बघितले त्यांना खूप हसू आले.

पण त्याच मुलींनी त्यांना युद्धात उरलेल्या दहाही दिवस तोडीसतोड उत्तर दिले. युद्ध कोणीच जिंकलं नाही पण विष्णुनगरीच्या मुलींनी शिवनगरीची इज्जत धुळीस मिळवली.

शिवनगरीचा राजा स्वत:ला कोसू लागला की आपण शिवनगरीच्या मुलींसमोर हारलो आणि काही दिवसातच त्याने आणि त्याच्या दोन्हीही भावांनी आत्महत्या केली.

राजाचा मोठा मुलगा आदित्य राजा झाला, तो त्याच्या बाबांच्या आणि काकांच्या मृत्यूला राणी लक्ष्मीबाईला दोषी मानू लागला आणि त्यातच त्याने शपथ घेतली, "मी राजा आदित्य शपथ घेतो की जसं मी माझ्या बाबांच्या देहाला अग्नी दिला आहे तसं पुढचं युद्ध सुरू व्हायच्या आधी राणी लक्ष्मीबाई तू तुझ्या मुलाच्या देहाला अग्नी देशील."

## २४ वर्षांनंतर

विष्णुनगरी आणि शिवनगरी या राज्यापासून खूप लांब अशा एका शहरात...

सुधा आणि शिवाजी देशमाने हे दांपत्य राहत होते. त्यांच घर एकदम साध, बैठ, पण मोठे होते...आत जाताना पहिले लागत होते ते गेट तेही उलट्या U आकाराचे त्याच्या बाजुने जमिनीलगत ३ फुट उंचीची भिंत ज्यावरुन एखादा उंच माणूस उडी टाकून सहज आत बाहेर करू शकेल...गेटला ना लोखंडी ना लाकडी दरवाजा... पण भिंतीवर लावलेल्या नावाच्या पाटीवरून ते घर सुधा आणि शिवाजी देशमाने या दांपत्याच आहे हे कळते... गेटमधून आत गेल्यावर छोटेसं आंगण नंतर दोन पायरी चढून वर गेल्यावर चौकोनी आकाराची पडवी त्याच्या बाजुने दोन आणि समोर दोन खोल्या, उजव्या हाताला देवघर डाव्या हाताला सुधा आणि शिवाजी देशमाने यांची खोली, समोर एका बाजुला स्वयंपाक खोली आणि शेजारी असलेली खोली ही त्यांची मुलगी, जावई आणि त्यांची मुलगी पुजा हिची... स्वयंपाक घरातून आत गेल्यावर मागे पडवीच्या एका बाजुला त्यांच्या मुलाची रामची खोली आणि दुसऱ्या बाजुला स्नानगृह आणि त्याच्या पुढे परसदार ...

सकाळची वेळ होती एक ४०-४५ वर्षांची महिला हातात दुधाचा ग्लास घेऊन राम राम करत घरभर फिरत होती,

“अगं सुधा का सकाळी-सकाळी राम नावाचा जप करतं आहेस...” देव पूजा करत असणारे रामचे बाबा बोलले.

“तो कुठे आहे ते आधी मला सांगा...”

“असेल इथेच कुठेतरी व्यायाम करत...”

“ते तर मलाही माहीत आहे हो, पण दिसत का नाही... जाऊदे मी तुमच्याशी बोलण्यात का वेळ घालवतं आहे कोणास ठाऊक... राम... राम...” असं म्हणत ती स्वयंपाक घरात गेली.

तिची मुलगी जी स्वयंपाक करत होती ती बोलली, “आई तू त्याला इथे कुठे शोधत आहेस, बाहेर कुठेतरी लपून बसला असेल आज कॉलेजचा पहिला दिवस आहे ना...”

“तू त्याची मोठी बहीण ना, मग त्याला समजवायचं सोडून, टोमणे कसले मारतीस गं...”

“किती समजावलं त्याला पण त्याचं लक्ष अभ्यासात कमी आणि मारामारीतच जास्त... तरी नशीब आपलं काठावर पास होत शेवटच्या वर्षापर्यंत तरी पोचला...”

तेवढ्यात मागून कोणीतरी बोलले, “झालं काय तुझं परत सुरू... आणि काय तुम्ही सासुबाई हिचं ऐकत उभा राहिलाय तो राम कधीची तुमची वाट बघतोय...”

“अहो पण तो आहे तरी कुठे...?”

“तुम्हाला तर माहीत आहेच की व्यायाम करताना तो बोलत नाही, मागच्या अंगणात आहे...”

“हम्म जाते...” म्हणत त्या तिथून निघून गेल्या.

“पुजा कुठे आहे तिचं आवरायला घे, तिला शाळेत सोडून मला पण कामावर जायचं आहे...”

पुजा ही रामच्या बहिणीची ७ वर्षांची एकुलती एक मुलगी.

“ती असेल तिच्या राम मामापाशी, माझं तर काही ऐकणार नाही तुम्हीच आता समजाऊन घेऊन या...”

“बरं...”

आई दूधाचा भरलेला ग्लास हातात घेऊन राम जेथे व्यायाम करत होता तिथे गेली...

राम हा सुधा आणि शिवाजी देशमाने यांचा एकुलता एक मुलगा, त्यामुळे सहाजिकच लाडावलेला... दिसायला उंच, देखणा

रूबाबदार...तरी त्याचा स्वभाव म्हणजे चांगल्या सोबत चांगलं तर वाईटासोबत वाईट... हाच त्याच्या आयुष्याचा गुरुमंत्र.

राम व्यायाम करत होता तर, पुजा त्याची नक्कल काढत होती. कारण तिला मामा व्यायाम करत असताना काही बोलणार नाही हे माहीत होतं... आणि नंतर तिची एक स्माईल मामाचा राग घालवण्यासाठी पुरेशी आहे हे देखील तिला माहीत होते.

त्या दोघांचा व्यायाम चाललेला बघून आई मध्येच बोलली, “खूप झाला हा तुम्हां मामाभाचीचा व्यायाम, राम हे घे दुध पी...”

पुजा, “आणि मला...”

आई, “अरे पुजासाठी तर मी दुध नाही आणलं तू असं कर आत जा आणि आईकडे माग ती देईल हा तुला, जा शहाण माझं बाळ ते...”

“पुजा... पुजा...” तेवढ्यात मागून तिचे बाबा आले.

“बाबा...” त्यांनी तिला उचलून घेतले.

“बघा ना बाबा आजीने मला दुध आणलंच नाही...”

“असं केलं आजीने, आपण आता हे मोठ्या बाबांना सांगू मग ते आजीला शिक्षा करतील...”

“हम्म...”

“मग चला आपल्याला शाळेत जायचंय ना मग आजीला आणि मामाला बाय करा...”

“बाय आजी... बाय मामा.

“बाय बच्चा...” राम

आईने दुधाचा ग्लास पुढे केला, “हे घे आधी दुध पी.”

रामचे दुध पिऊन झाले आणि तेवढ्यात त्याला फोन आला, “Hello... बोल आज्या.”

(आज्या म्हणजे अजय. विज्या म्हणजे विजय. आणि किशन अशी चौघा मित्रांची जोडी. अगदी बेस्ट फ्रेंड्स म्हटलं तरी चालेल.)

“Hello… राम, तू सांगितलेलं निम्मं काम झालं आहे, तू लवकर ये नाहीतर उशीर होईल.”

“हा आलोच” म्हणून रामने फोन ठेवला.

रामने बाईक स्टार्ट केली आणि पंधरा मिनिटानंतर एका बंगल्यासमोर थांबवली ते एक लग्नघर होते तेवढ्यात त्याला विज्याचा फोन आला, “ Hello… अरे कुठं आहेस...?”

“मी इथे पोचलो आहे तुम्ही दोघेही अर्ध्या तासात रेल्वेस्टेशनवर भेटा,” असे म्हणून रामने फोन ठेवला.

**इकडे रेल्वेस्टेशनवर,**

“अर्धा तास झाला, अजून कसा आला नाही हा, गाडी सुटायची वेळ सुद्धा झाली आहे ...” असं घड्याळ्याकडे बघत आज्या विज्याला बोलला. दोघेही स्टेशन बाहेर रामची वाट बघत होते.

तेवढ्यात रेल्वे स्टेशनवरून सुटायला लागली.

“अरे तो बघ राम आला” विज्या.

मागे वळून बघितलं तर रामची बाईक आली, त्याच्या पाठीमागे बुरखा घालून कोणीतरी होते. दोघेही गाडीवरून पटकन उतरले.

रामने बुरख्यातल्या व्यक्तीचा हात धरला आणि गाडीच्या दिशेने पळू लागला. पुढे राम आणि मागे बुरख्यातील व्यक्ती, आणि रूळावरून हळूहळू सुटणारी रेल्वे... पुढे डब्यापाशी पोहचताच लग्नाचा शालू घातलेल्या एका मुलीने आपला हात पुढे केला.

रामने बुरख्यातील व्यक्तीला पुढे केलं आणि रेल्वेमध्ये चढवलं आणि स्वत: तिथेच थांबला. बुरख्यातल्या व्यक्तीनेवर चढताच स्वत:चा बुरखा वर केला. बुरख्यात एक मुलगा होता...

तो मुलगा धापा टाकत बोलू लागला, "राम खरंच खूप उपकार झाले तुझे तू आम्हाला पळून जाण्यास मदत केली नसती तर काय झालं असतं हा विचार सुद्धा करवत नाही..."

तेवढ्यात त्यामुलीने त्यामुलाचा हात हातात घेतला आणि रामकडे बघून बोलली, " Thank you so much राम"

"मी जे काही केलं ते मैत्री आणि प्रेमासाठी केलं, त्यामुळे thanks म्हणण्याची गरज नाही..."

आता रेल्वेगाडीचा वेग थोडा वाढला आहे हे लक्षात येताच राम बोलला, "बरं ते सगळं जाऊदे पुढे काय करायचंय ते लक्षात आहे ना...?"

दोघेही मुलगा आणि मुलगी एकमेकांकडे बघून हसले... "हो आहे लक्षात"

“तिथे पोहचल्यावर मला फोन करा...” असं म्हणून रामने त्यांना बाय केलं.

तेवढ्यात मागून विज्या जोरात ओरडला, “रामऽऽऽ... मागे वळून बघ...”

रामने मागे वळून बघितलं तर आठ गुंड त्याच्या मागे उभे होते ते पण हातात बांबुच्या जाड काठ्या धरून, त्यातील एक जण पुढे येऊन बोलला, “ते दोघे तर गेले पळून, आता तुझं काय, तुला कोण वाचवणार.” असं म्हणून तो आणि त्याचे साथीदार एकमेकांकडे बघून हसायला लागले.

लांब उभे असलेले आज्या आणि विज्या रामच्या मदतीसाठी पळत त्याच्याकडे येऊ लागले तर पळत येणाऱ्या आज्या, विज्याला रामाने हात दाखवून लांबच थांबायला सांगितले. त्यातील दुसरा गुंड...“ आम्ही आठ तू एकटा स्वत:ला काय हिरो समजतो काय.”

राम अगदी स्टाईलमध्ये, “समजायचंय काय आहेच मी हिरो” असं म्हणून एक एकाला अस धुतो जणू धोबी घाटचा धोबी कपडे धुतो.

फाईट पूर्ण झाल्यावर आज्या म्हणाला, “चला लवकर आज कॉलेजचा पहिला दिवस उशीर व्हायला नको.”

विज्याने पोटाला हात लावला, “अरे मला आता भूक लागली आहे.”

रामने त्यांच्याकडे पाहिले, “ठीक आहे आपण आधी माझ्या घरी जाऊ मस्तपैकी काही तरी खाऊ मग किशनकडे जाऊ आणि मग कॉलेजला.” दोघांनीही ok म्हणत गाडीला किक मारली.

तिघेही रामच्या घरी पोहचले तेव्हा त्याच्या घरापुढे गर्दी होती. गर्दीकडे पाहत आज्या बोलला, “तुझ्याघरापुढे एवढी गर्दी कसली रे ?”

राम, “माहीत नाही, चला बघुया काय झालं आहे.” असं म्हणून गर्दीतून मार्ग काढत तिघेही आत गेले.

रामला पाहताच गर्दीतून एक माणूस रागात बोलला, “हे पहा रामची आई आला तुमचा राम विचारा त्याला, कुठं पळवून नेलय माझ्या सायलीला.”

विज्याने आज्याला विचारले, “ही सायली कोण…?”

“अरे आत्ताच आपण तिला पळून जायला मदत केली ती…”

“अरे हो मी विसरलोच…”

आईने रामकडे पाहिले, “राम ह्यांची मुलगी कुठं आहे, त्यांचं म्हणणं आहे की तू तिला पळवून नेलं आहे.”

राम, “आई मी तुझ्यासमोर उभा आहे. मी कसा तिला पळवून नेईल.” बरोबर बोलतोय माझा मुलगा, तुम्ही माझ्या मुलावर कसलेही आरोप करू नका.” असं म्हणून रामच्या आईने रामची बाजू घेतली.

तिचा बाप रागात, “हे पहा रामची आई मी असं म्हणत नाही की माझी सायली तुमच्या मुलाबरोबर पळून गेली आहे. मी म्हणालो तिला पळून जाण्यास रामने मदत केली आहे.”

आई आपल्याकडे बघत आहे हे कळताच राम, “आई तुझी शप्पथ मी...” राम थोडा अडखळला.

“आता बोल आता का गप्प बसला, बोल” सायलीचे बाबा.

“एक मिनिट आधी मला सांगा किती वाजताच्या सुमारास सायली पळून गेली.

सायलीच्या बाबांनी आजुबाजुच्या लोकांकडे बघितले आणि बोलले, “दोन तास झाले असतील.”

“मी एका तासापुर्वी सिटी हॉस्पिटलमध्ये होतो, सायलीचा आणि राहुलचा ॲक्सिडंट झाला होता, मी तिकडेच होतो.”

“काय ॲक्सिडंट कशी आहे माझी सायली, लय लागलं तर नाही तिला...”

राम, “लागलं तर आहे, पण मला वाटत तुम्हीच जाऊन बघावं.”

“हा लगेच जातो ...” असं म्हणत सायलीचे बाबा ताडकन तेथून निघून गेले आणि बाकिचेही.

आईने आज्या विज्याकडे पाहिले, “मी असंही म्हणू शकत नाही की तुम्ही ह्याला बिघडवताय, कारण मला माहीत आहे की हाच तुम्हाला बिघडवतोय ते, तो किशन तुमच्यात कसा आला कुणास ठाऊक गुणी बाळ आहे, त्याला बिघडऊ नका म्हणजे झालं.”

“आई तुझं आपलं काहीतरीच असतं, आम्हाला भूक लागली आहे जेवायला वाढ.”

“हात धुऊन घ्या जेवायला वाढते.” असं म्हणून आई निघून गेली.

रामच्या खांद्यावर अचानक हात पडताच त्याने मागे वळून बघितले, “दाजी तुम्ही...”

“हा मीच, आता बोला पटापट काय झालं ते”

“काय दाजी, कशाबद्दल”

“हेच की कुठे गेलता तुम्ही, अगदी खरंखरं सांगा.“

राम त्यांना सगळं सांगतो की कसं सायली आणि राहुलचं प्रेम, घरच्यांच्या विरोध, ते पळून जाण्यासाठी केलेली मदत.

“आणि ही हॉस्पिटलची काय भानगड आहे...?”

“काही नाही, त्यांचा सायली आणि राहुलच्या लग्नाला नकार होता पण आता हॉस्पिटल येईपर्यंत त्यांच्या डोक्यात खूप विचार येतील की आपण जर होकार दिला असता तर सायली आज हॉस्पिटलमध्ये नसती आणि तिथं हॉस्पिटलमध्ये पोहचल्यावर तिला सुखरूप पाहिल्यावर ते त्यांच्या लग्नाला होकार देतील.”

“आणि नाही दिला तर?”

राम एकदम स्टाईलमध्ये, “दाजी तुम्हाला तर माहीतच आहे... त्या श्रीरामांच्या धनुष्यातून निघालेला बाण आणि ह्या रामच्या डोक्यांतून निघालेला प्लॅन कधीच फेल जात नाही.”

तेवढ्यात आईचा आवाज आला.

राम, “चला जेवुया.”

जेवण झाल्यावर तिघेही किशनकडे निघाले. आज्या विज्या एका बाईकवर तर राम दुसऱ्या बाईकवर. त्याच्याकडे जाताना रामला आईचे शब्द आठवले. किशन म्हणजे एक साधा सरळ कॉलेज टॉपर. आमचा आणि त्याचा काही संबंध नाही. पण मागच्या सेमला त्याने केलेल्या मदतीमुळे आम्ही तिघेही पास झालो. तेव्हापासून तो आमच्या ग्रुपचा भाग झाला.

किशनच्या बंगल्यासमोर बाईक थांबवून रामने आणि आज्याने हॉर्न वाजवला हॉर्नचा आवाज ऐकून किशन बंगल्याबाहेर आला आणि गेटमधून बाहेर आल्या आल्या बोलला, "आज उशीर झाला."

आज्याने घड्याळात पाहिले, "हा थोडासा, बस पटकन तुला वाटेत सांगतो."

"अरे थांबा माझी बहीण येत आहे, ती यावर्षी आपल्यासोबत शिकणार आहे."

बहीण म्हणताक्षणी आज्या आणि विज्याची नजर बंगल्याकडे वळली, साहाजिकच कोण आहे आणि महत्त्वाचं दिसायला कशी आहे हे पाहण्यासाठी...

किशनने बंगल्याकडे पाहिले, “मेघना चल लवकर आपल्याला उशीर होईल...” तशी मेघना बंगल्याच्या गेटमधून बाहेर आली.

तशी आज्या आणि विज्याची नजर तिच्यावर पडली, आधी दोन सुंदर पाय त्यात छुमछुम वाजणारे पैंजण, सुंदर अशी लाल हिरव्या रंगाची साडी, लांब केसांची वेणी, छोटी गोल टिकली, गळयात सोन्याची चैन तर कानात सोन्याच्या रिंगा, वर्ण गोरा, त्यात गालांवर खळी त्यामुळे तर ती खुपच सुंदर दिसत होती... पण त्याच बरोबर त्यांच्या हे ही लक्षात आलं की ती त्यांच्या टाईपची नव्हती. म्हणून दोघांनीही तिच्यावरील नजर बाजूला केली.

मेघना गेटमधून बाहेर आली तेव्हाच नेमका रामला फोन आला, त्यामुळे मेघनाकडे न पाहता त्याने बाईकवर बसून आलेला कॉल उचलला, “Hello..बोल जय.”

जय हा रामचा मित्र. तो वयाने रामपेक्षा ५ वर्षांनी मोठा होता पण अनाथ असल्यामुळे आणि खूप हुशार असल्याने रामने त्याला शिक्षणासाठी लागणाऱ्या पैशांची मदत केली. आणि नंतर स्कॉलरशिप मिळवून तो डॉक्टर बनला आणि त्याच शहरात एका हॉस्पिटलमध्ये कामाला लागला. तोही रामचा खूप चांगला मित्र

होता. जय रामला खुपच मानत असतो कारण राम सोडून त्याचं या जगात दुसरं आपलं म्हणणारं कोणीच नव्हतं.

किशनने मेघनाची आज्या आणि विज्याबरोबर ओळख करून दिली. रामची ओळख करून देणार तेवढ्यात,

रामने मोबाईलला थोडा बाजूला केला आणि मागे वळून न बघता बोलला, “किशन चल लवकर, नंतर ओळख करून दे बस पटकन गाडीवर.

किशनने मेघनाकडे पाहिलं, “तू बस रामच्या गाडीवर मी या गाडीवर बसतो.” तिने मानेने होकार दिला.

मेघना गाडीवर बसली, रामने खिश्यातून हेडफोन काढला, मोबाईलला जोडून कानात अडकवला, फोन खिशात ठेवला आणि बाईकला किक मारली.

जाता जाता रामने मोबाईलवर जयला ... तर विज्याने किशनला ...सकाळचा प्रसंग सांगितला, मेघनाने देखील ऐकला.

कॉलेजच्या गेटमधून आत जाताच, बाईक पार्किंगमध्ये गाडी थांबवून रामने जयला बाय करून फोन ठेवून दिला.

रामला बघताच मुलींचा घोळका त्याच्या भोवती आला. त्यांना पाहून मेघना बाजूला झाली. त्यांनी मेघनाकडे पाहिले आणि रामला विचारले, “राम ही कोन...?”

तो मागे वळून बघणार तोपर्यंत ती तिथून निघून गेली होती आणि त्याच्या लक्षात आलं की अजून आपण तिला पाहिलं देखील नाही.

“राम.. राम.. लक्ष कुठं आहे, कोन होती ती मुलगी ?” रीना (रीना, राम वर जाम फिदा, पण राम कधी तिच्याकडे पाहत नसे.)

“ती होय किशनची बहिण आहे. आपल्या कॉलेजमध्ये न्यु ॲडमिशन आहे.”

तिथून थोड्याशा लांब अंतरावर उभी असलेल्या मेघनाने रामकडे बघत किशनला विचारले, “किती मुली आहेत ह्यांच्या भोवती, हे नक्की करतात काय...?”

“तो काही करत नाही हाच तर प्रॉब्लेम आहे.”

“मी नाही समजले.”

“त्याला हे सगळं नाही आवडत, पण तो हे त्या मुलींना नाही सांगणार...

“का...?”

तो एकावेळी कितीही गुंडाना एकटा मारेल, पण कोणत्याही मुलीकडे नजर वर करून पाहणार नाही.”

“पण ते तर त्यांच्याशी बोलत आहेत...”

“आता बघ दोन मिनिटात कसा त्या घोळक्यातून बाजूला होतो.”

आणि अगदी तसंच झालं.

“हा तुम्ही चांगल ओळखता त्यांना”

“हो मग आम्ही मित्र कमी एकमेकांचे भाऊच जास्त वाटतो. तू असं कर ती पुढे रुम दिसतीये ना ती आपली क्लासरुम आहे, तू जा मी प्रिंसिपलांना भेटून येतो.”

“हम्म.”

मेघना क्लासरुमकडे जाता जाता आजुबाजुला बघते. कॉलेज खूप मोठं होतं तिने याआधी येवढं मोठं कॉलेज कधीच पाहिलेलं नव्हतं. कॉलेज चार मजली होती. प्रत्येक मजल्यावर दहा खोल्या आणि बरोबर मध्यभागी जिना होता. कॉलेजसमोर मोठ ग्राउंड आणि त्याच्या बाजुने मोठ मोठी झाडे त्यात अशोकाचे, नारळाचे, बदामाचे अशी खूप झाडे आणि बरीचशी फुलझाडे ही होती.

ग्राऊंडवर बरीचशी मुले मुली होती त्यांना पाहून तिच्या लक्षात आलं की तिने एकटीनेच साडी घातली होती आजुबाजुच्या मुलींनी कोणी पंजाबी ड्रेस तर कोणी लेगिज- टॉप तर कोणी जिन्स टॉप अशी कपडे घातलेली होती आणि त्यामुळेच की काय पण आजुबाजुने जाणारी मुले, मुली तिच्याकडे बघून हसत होती.

तिकडे राम, आज्या आणि विज्या क्लासरूमच्या दिशेने जात होते.

"राम यातल्या एखादीला हो म्हण लाईफ सेट हे बॉस..." असं म्हणून आज्या विज्याने एकमेकांना टाळी दिली.

"तुम्हाला माहीत आहे मला कशी मुलगी पाहिजे... मग का परत परत तेच बोलता."

त्याला मध्येच थांबवत, "एक... एक मिनिट... मी सांगतो. अशी मुलगी जी बिनधास्त असेल, तिला माहिती असेल की तिला तिच्या आयुष्यात काय करायचं आहे आणि महत्त्वाचं तिला तिचं रक्षण स्वत: करता आल पाहिजे." असं म्हणत विज्याने हसायला सुरुवात केली.

"हसतो काय तुला काय वाटत मला अशी मुलगी भेटणार नाही"

विज्या, “मी असं कुठं म्हटलं नाही भेटणार, भेटणार की तुला.”

आज्या, “अरे तिला जाऊदे, राम मेघनाला बघितलं का तुझी अणि तिची जोडी मस्त आहे.”

“वेडा झाला आहे का तू... अरे ती किशनची बहीण आहे...गप बसा काहीही बोलू नका चला आता.”

क्लासरूममध्ये गेल्यावर त्यांना दिसले की, सगळी मुले घोळका करून मोठमोठ्याने हसत होती. त्यांना काहीच समजत नव्हते काय चाललं होतं.

रामने थोडंसं पुढे जाऊन विचारले, “काय चाललं आहे येथे.”

त्याला तिथे पाहून सगळे आपापल्या जागेवर जाऊन बसले. त्या घोळक्याच्या मध्यभागी मेघना आणि स्वाती होती, स्वाती देखील मेघना सारखी साधी मुलगी होती आणि त्यात कॉलेजमध्ये साडी घालून आल्यामुळे सगळे त्यांच्यावर हसत होते.

मेघनाने रामकडे बघून स्माईल दिली. पण रामने बघून न बघितल्यागत केलं आणि पुढे जाऊन तो त्याच्या बेंचवर जाऊन बसला.

बेल वाजली, किशन ही तोपर्यंत आला. सगळेच आपापल्या जागेवर जाऊन बसले. मेघनाला आणि स्वातीला कोणीही त्यांच्या शेजारी बसू दिले नाही. मग शेवटी दोनच जागा राहिल्या एक राम शेजारी आणि दुसरी किशन शेजारी.

स्वाती किशनशेजारी बसली मग मेघनाला रामशेजारी बसावं लागलं.

सर आत येताच सगळे उभे राहिले, “well-come sir”

“sit down, आता कॉलेजचं शेवटच बर्ष सुरू झालं, आता तरी अभ्यास करा, काय राम, अजय, विजय.”

“हो सर “

“मला क्लासमध्ये एक नवीन विद्यार्थीसुद्धा दिसत आहे, हा तू नाव काय तुझं.” सरांनी मेघनाकडे बोट दाखवले.

“मेघना”

“शेवटच्या वर्षाला इकडे ॲडमिशन कसं घेतलं.”

“किशन दादा म्हणाला हे कॉलेज खूप छान आहे म्हणून...”

“किशनची बहीण आहेस... छान, म्हणजे तू ही हुशार असणार. Sit down, तर आज कोणतेही लेक्चर होणार नाही, उद्या नवीन विद्यार्थांच्या स्वागताचा कार्यक्रम तुम्ही आयोजित करायचा

आणि तुमची जी काही पार्टी असेल तर ती कॉलेज सुटल्यावर करायची.” असं म्हणून सर निघून गेले.

सगळयामुलांनी शिट्टया वाजवायला सुरुवात केली.

राम मात्र मेघनाकडे बघत राहिला, “तू किशनची बहिण आहेस”

मेघनाचे हावभाव बघून, “हे बघ मला माहीत आहे सकाळी आपण एकत्र आलो, पण मी नाही पाहिलं तुला sorry…”

“it’s ok”

“sorry again”

“परत कशाबद्दल”

“तू मघाशी मला smile दिली आणि मी तुला ignore केलं. मला वाटलं तू दुसऱ्या मुलींगत माझ्यावर लाईन मारत आहेस.”

“काय मी आणि तुमच्यावर लाईन मारत आहे... तुम्ही असा विचारतरी कसा करू शकता... अहो आपण सकाळीच तर भेटलो... आणि तुम्ही...”

तिला मध्येच थांबवत राम बोलला, “अगं हो हो थांब ...Sorry म्हटलं ना... तुला”

“ok…”

“Friends” हात पुढे करत.

“ok friends” तिनेही हात पुढे करून हात मिळवला.

“एक विचारू तू आणि किशन एका वर्गात कसे, तुम्ही जुळे आहात का?“

“नाही... मी मामेबहीण आहे त्यांची.”

**दुसऱ्या दिवशी,**

कार्यक्रम सुरू झाला, नवीन विद्यार्थ्यांचं स्वागत झालं, शिक्षकांची भाषणे झाली. काही विद्यार्थ्यांची मनोगते देखील झाली.

सुत्रसंचलन करणारी रिना बोलू लागली, "आपला कार्यक्रम संपला हे जाहीर करण्याआधी मी रामला विनंती करते त्याने दोन शब्द बोलावे."

अचानक बोलावल्यामुळे थोड्या गोंधळलेल्या अवस्थेत राम पुढे गेला.

"हे आमचं शेवटच वर्ष, सर म्हणाले राम आता तरी अभ्यास करं… आई म्हणते मार्क्स चांगले नाही मिळाले तर नोकरी मिळणार नाही, नोकरी नाही तर पुढे काय होणार...हा तिचा नेहमीचा प्रश्न...

पण यांना किती वेळा सांगायचं की मला नोकरी करायचीच नाही.

खरं सांगायचं तर प्रत्येकाच्या आयुष्यात त्याचं एक स्वप्न असतं आणि माझंही आहे,

गावात माझी स्वतःची शेती असावी, त्यात माझं छोटंसं पण छान घर, मी शेतात काम करणार, दुपारी बायको गरम गरम जेवण

बनवून घेऊन येणार, मग आम्ही दोघेही मस्त एकमेकांना घास भरवत जेवणार.

आई बाबा अंगणात खाट टाकून बसणार, आणि त्यांच्या समोर माझी दोन्ही चिलीपिली आंगणभर खेळणार.

माझं सर्व कुटुंब माझ्यासमोर असणार. भलेही पैसा कमी असेल पण मन आनंदाने भरलेलं असेल.

यासाठी मला वाटत नाही मला शिक्षणाची गरज आहे, तरीही जेवढं गरजेचं आहे तेवढं शिक्षण नक्कीच घेतो आहे...”

टाळयांच्या कडकडाटाचा आवाज पूर्ण हॉलमध्ये पसरला. कार्यक्रम संपल्यावर सगळे घरी गेले.

**किशनच्या बंगल्यामध्ये,**

किशनने रामला फोन केला, ’’राम, पार्टी किती वाजता सुरू होणार आहे.’’

“७ वाजेपर्यंत होईल सुरू”

“ठीक आहे मग तू कॉलेजमध्ये भेट, आम्ही दोघेही डायरेक्ट तिथेच येतो”

“ok”

किशनने फोन ठेवला.

“मेघना आवर लवकर उशीर होईल आपल्याला.”

“हा झालं... चला.”

किशनने तिच्याकडे बघितलं, “हे काय घातलं आहे तू !”

“साडी…… कशी दिसतेय मी?”

“अगं पार्टी आहे, पार्टीला कोणी साडी घालतं का.”

“मला आवडते घालायला, चला नाहीतर उशीर होईल.”

“आणि आधी हे अहो जाहो बंद कर.”

“मी तुमच्याशी एकेरी आवाजात नाही बोलू शकत, आणि का त्याचं कारण तुम्हाला माहीत आहे.”

“बरं बाई...चल आता...”

**कॉलेजमध्ये,**

मिटींगच्या हॉलमध्ये पार्टीची सोय केली होती. किशन आणि मेघना पोहचले तेव्हा पार्टी सुरू झालेली होती. मुलं मुली आपापल्या ग्रुपबरोबर उभी होती. काहीजण गाण्यांच्या तालावर डान्स करत होती तर काही ड्रिंकची मजा घेत होती.

किशन, “मी रामला फोन करतो कुठे आला आहे विचारतो तोपर्यंत तू बाहेरच थांब आत जाऊ नको” असं म्हणून तो तेथून निघून गेला.

तेवढ्यात मेघनाला कोणीतरी आवाज दिला, तिने इकडे तिकडे पाहिले, तेवढ्यात तिला स्वाती दिसली आणि तिने हात वर केला, “हाय... आलेच मी थांब तिकडेच...”

ती गडबडीत स्वातीकडे जायला निघाली तिचा धक्का बाबुला लागला आणि ही गोष्ट तिच्या लक्षात आली तिने त्याची माफी मागितली, “आय यम सॉरी...”

बाबु एका टवाळ ग्रुपचा लिडर. रामचा आणि त्याचा छत्तीसचा आकडा...

“अरे हा बघं कसला माल आलाय पार्टीला.” बाबुने तिच्या साडीला हात लावला.

“हे बघा सोडा मला जाऊद्या”

बाबुने तिचा हात पकडला.

“सोडा मला जाऊद्या”, मेघना तिचा हात सोडवण्याचा प्रयत्न करू लागली. तेवढ्यात अचानक काहीतरी झालं दुसराच एक हात मेघनाच्या मागून आला त्याने गपकन बाबुचा हात धरला तसा बाबुने मेघनाचा हात सोडला. मेघनाने मागे वळून बघितले तर मागे राम उभा होता.

रामने त्याला एक सनकन कानाखाली वाजवली, “मुलींची छेड काढतो, लाज नाही वाटत, चल माफी माग तिची”

बाबु, “सॉरी...”

“जा... चल निघ” राम.

बाबुने जाता जाता बोट दाखवलं, “आज हा आला म्हणून वाचलीस, बघून घेईन दोघांना” असं म्हणून तो तिथून निघून गेला.

“thanks...” मेघनाने रामकडे पाहिलं.

“कशाबद्दल” रामला मुलींनी स्वतःच्या रक्षणासाठी दुसऱ्यावर अवलंबून राहणं मुळीच आवडत नव्हतं. आणि म्हणूनच तो मेघनावर चिडला होता.

“तुम्ही मला बाबुपासून वाचवल्याबद्दल.”

“म्हणजे जे काम तू तुझ्यासाठी करायला पाहिजे ते मी केलं म्हणून thanks”

“तुम्ही काय म्हणताय ते समजलं नाही.”

“काल सगळे मिळून जेव्हा तुला त्रास देत होते तेव्हा तू काही बोलली नाही. मला वाटलं ठीक आहे नवीन जागा आहे. पण आज ही तेच... “

“तुम्हाला ही वाटत की मी साडी घालून चूक केली.”

“प्रश्न कपड्यांचा नाही, तू काहीही घाल, प्रश्न आहे स्वरक्षणाचा,

मुलींना स्वत:चं रक्षण स्वतः करता आलं पाहिजे.”

मेघनाच्या डोळ्यात पाणी आलं ती तेथून निघून गेली. स्वाती ही तिच्यापाठोपाठ तिला समजवायला गेली.

आज्या, “राम तू एवढं का बोलला तिला”

विज्या, “जा आधी जाऊन तिची माफी माग”

किशन ही तेथेच उभा होता... जाणाऱ्या रामला त्याने थांबवले आणि म्हणाला, “त्याची काही गरज नाही, तिला थोडा वेळ दे, ती होईल बरी.”

विज्या, “ती तुझी बहिणच आहेना, ती एवढी रडली तुला काहीच वाटत नाही.”

“कारण ती माझी बहिण आहे आणि तिला मी चांगलंच ओळखतो, तिला कोणत्या गोष्टीच वाईट वाटेल आणि कोणत्या नाही ते, चला आपण ड्रींक पिऊया” रामला तो बळबळ घेऊन गेला.

थोड्यावेळान स्वाती पळत बाहेर आली...

आज्या, “अगं चोर बिर लागला की काय पाठीमागे, धाप लागेपर्यंत पळायला...” असं म्हणत आज्याने विज्याला टाळी मारली.

राम, “तुम्ही दोघं कुठे ही कसं सुरू होता, स्वाती तू आधी शांत हो आणि काय झालं सांग...”

“राम ते...”

“काय झालंय स्वाती...?” तिचा घाबरलेला चेहरा बघून किशन बोलला.

“किशन ते बाबु मेघनाला उचलून घेऊन गेला.”

“एवढंच ना...” असं म्हणून त्याने मोठ्याने श्वास सोडला.

त्याच लक्ष बाकिच्यांकडे गेलं, सगळे त्याच्याकडे टक लावून बघत होते मग त्याने स्वतःला सावरलं पुन्हा स्वातीकडे गंभीर होऊन पाहिले आणि म्हणाला, “काय... कुठे घेऊन गेला तो...?

दोन मिनिटे सगळेच शांत झाले कारण किशनचं असं वागणं कोणालाच समजलं नाही.

स्वाती, “कॉलेजच्या मागच्या मैदानाकडे...” असं म्हणाली आणि सगळेजण तिकडे पळत सुटले.

**कॉलेजच्या मागच्या मैदानावर,**

मेघनाला बाबुने मैदानावर उतरवले, “तुझ्या साडीला हात लावला म्हणून रामने माझ्यावर हाथ उचलला...या बाबुवर हाथ उचलला. बघ आजुबाजुला कोणी नाही येणार आता तुला वाचवायला.

“सोडा मला प्लिज” असं म्हणून मेघना रडायला लागली आणि पळायचा प्रयत्न करू लागली. पण तिला तिथून पळता येत नाही. कारण दहा लोकांनी मिळून साखळी केली होती.

“आता मी तुझं वस्त्रहरण करणार आणि ते सोशल साईट्सवर टाकणार, मग बघू तो राम काय करतो ते.”

“भाई उरका नाही तर सगळे येतील, मी शुट करतो.” त्यातीलच एक गुंड मोबाईल हातात घेत बोलला.

“तुम्हाला काही आयाबहिणी आहेत की नाही, तुम्ही असं कसं करू शकता प्लिज सोडा मला ……” मेघना रडत रडत बोलली.

तेवढ्यात बाबुने तिचा पदर पकडला.

“नाही... प्लिज मी तुमच्या पाया पडते मला माफ करा.” मेघना कधी हात जोडत तर कधी, पदर पकडत बोलत होती.

“अरे बोलत काय बसलाय बाबु भाय... मी शुटिंग सुद्धा सुरू केलंय...”

बाबुने तिची साडी जोरात ओढली तशी मेघना गरगर फिरली, साडी बाबुच्या हातात येताच ती त्याने लगेच हवेत उडवली, हे सगळं काही क्षणातच घडलं...

तेवढ्यात राम, केशव पार्टीसाठी आलेले सर्वजण तेथे पोहचले आणि त्यांनी जे काही पाहिलं त्यांचा त्यांच्या डोळयांवर विश्वास बसला नाही.

एक वेगळीच मेघना, तिला पाहून बाबु आणि त्याच्या गॅंगच हसनच थांबलं. मेघनाने साडीच्याआतून जिन्स टॉप घातलेला होता. हे पाहून आज्या, विज्या आणि स्वाती सगळे बाबुकडे बघून हसायला लागले.

बाबुला ते सहन होत नाही तो ओरडला, “ये... तुला सोडणार नाही आता.”

बाबु तिच्याजवळ जाताच मेघना त्याने तिच्यावर उगारलेला हात पकडून कोपऱ्यात मुडपून त्याच्या पाठीला दाबते आणि दुसऱ्या हाताने त्याची कॉलर पकडते तेव्हा त्याचं तोंड तिच्या विरुद्ध बाजूला होतं,

"तुझी हिम्मत कशी झाली माझ्या अंगाला हात लावायची..."

असं ओरडून तिने त्याला जमिनीवर आपटलं... मेघनाच्या चेहऱ्यावरून आणि हावभावावरून हे स्पष्ट दिसत होतं की तिचा राग अनावर होत होता... आणि ज्याच्यावर तिचा हात पडेल त्याची काही खैर नव्हती...

बाबुने खाल्लेला मार बघून सगळे गप्प झाले. दोन मिनिटे शांततेत गेली, कोणालाही हे पटत नव्हतं की ही तिच मेघना आहे जी मघाशी रडत होती...

तिला मारायला अजून दोन पोरं आली मेघनाने त्यांना हात दाखवला ती मुले आहे त्याच जागेवर थांबली मग तिने स्वतःच्या केसांच्या वेणीचा विग काढून त्यातल्या एकाच्या हातात दिला व आपल्या दोन्ही हातांनी बॉपकट असलेली केस हालवले. आणि

त्या दोघांना ही तिने तिच्या स्टाइलने मारले. ती ज्या पद्धतीने फाईट करत होती त्यावरून हे स्पष्ट होतं की तिने ट्रेनिंग घेतलं होतं.

नंतर बाकिची मुले देखील मदतीला आली.

राममात्र तिच्याकडे एकटक पाहत होता. पार्टीतही त्याचं लक्ष तिच्याकडेच होतं. घरी आल्यावर देखील तिचा विचार त्याच्या मनातून जात नव्हता.

**रामच्या घरी,**

राम स्वतःच्या रूममध्ये आरश्यासमोर उभा राहून स्वतःशीच बोलू लागला, “राम काय होतंय तुला?... सतत तिचाच चेहरा का येतोय डोळयासमोर... अरे ती किशनची बहीण आहे तिच्याबद्दल विचार करणं चुकीचं आहे...... राम सावर स्वतःला”

तेवढ्यात मागून त्याचे दाजी आले, “स्वतःशीच काय बोलतोय राम...”

स्वतःला सावरत राम बोलला, “काही नाही दाजी...”

“आता माझ्यापासून सुद्धा लपवणार होय तू...”

“तसं नाही दाजी...ते...”

“अरे सांग मन मोकळं होईल तुझं.”

रामने त्यांना मेघना भेटल्यापासून ते पार्टीत घडलेल्या प्रसंगापर्यंत सगळ काही सांगितले.

“ओह... असा आहे तर मॅटर...”

“माहीत नाही दाजी काय पण, सतत जिकडे-तिकडे तिच समोर दिसतं आहे, मनात तिचा विचार जरी आला तरी काळीज धडधड करतं आहे, काय होतं आहे काहीच समजत नाहीये...

आणि त्यात ती किशनची बहीण आहे मी तिच्याबद्दल असं विचार करणं चुकीचं आहे.”

“हे बघ राम तुझं मेघनावर प्रेम आहे... आणि प्रेम हे आपण मनातून करतो, मनापासून करतो... त्यामुळे त्यात चुकीचं असं काही नसतं” दाजी.

“काहीतरीच काय दाजी, प्रेम आणि माझं तेही मेघनावर... अहो दोनच तर दिवस झालेत तिला भेटून.”

“तुला पटत नाही, ठीक आहे डोळे मिट, कोन दिसतंय ते सांग...?”

त्याच्या चेहऱ्यावर एक गोड स्माईल आली...मेघना...म्हणजे मी मेघनावर प्रेम करतो... असं राम मनात म्हणतच असतो की…

“मी बरोबर होतो ना राम मेघनाचा चेहरा दिसला ना तुला?”

“नाही… नाही दिसला तिचा चेहरा...” राम थोडासा अडखळत बोलतो.

“राम माझ्याशी खोटं बोल पण स्वतःच्या मनाशी खोटं नको बोलू... आणि जर तुला किशनला काय वाटेल याची काळजी असेल तर त्याच्याशी स्पष्ट बोल आणि मग निर्णय घे... मी जातो” असं म्हणून दाजी निघून गेले.

“दाजी बरोबर बोलत होते माझं मेघनावर प्रेम आहे… पण मला हे तिला सांगायच्या आधी किशनला सांगितलं पाहिजे.”

**दुसऱ्या दिवशी सकाळी रामच्या घरी,**

रामच्या आईने रामला विचारले, “राम काल काय झालं कॉलेजमध्ये”

“काही नाही, पण तू का विचारत आहेस…?”

“कॉलेजमधून फोन होता, तुझ्या बाबांना बोलावलंय, काय झालं ते खरंखरं सांग.”

“मला नाही माहीत का बोलावलं आहे.”

“बरं चल मी येतो तुझ्याबरोबर, मग बघू काय झालं ते, तू काळजी करू नको आपला राम काहीही चुकीच वागणार नाही विश्वास आहे माझा.” बाबा.

**कॉलेजमध्ये,**

कॉलेजमध्ये गेल्यावर कळलं, काल मार खाल्लेल्या मुलांच्या आई वडिलांनी तक्रार केलेली होती म्हणून प्रिंन्सिपलांनी पार्टीत असणाऱ्या सर्वांच्या पालकांना बोलावलं होतं. कारण त्या पोरांनी घरी काहीच सांगितलेलं नव्हतं.

रामचे बाबा, "काय झालं सर आम्हाला का बोलावलं आहे इथे?"

प्रिंन्सिपल, "हो सांगतो पण त्याआधी, या मुलांना कोणी मारलं त्या सर्वांनी समोर या" सगळे समोर आले. त्यात मेघनाला पाहून सगळे आश्र्चर्यचकित झाले.

बाबुची आई, "तुला लाज नाही वाटत एक मुलगी असूनही मारामाऱ्या करतेस. हेच शिकवलं का तुझ्या आईबापाने...!"

आईबापांचे नाव घेताच मेघनाला खूप राग आला पण तो मनातच दाबून ती बोलली, "हे बघा काकू, माझ्या आईबापाने मला काय शिकवलं किंवा काय नाही शिकवलं त्यावर आपण नंतर कधीतरी बोलू पण आधी तुमच्या पोरांनी मार का खाल्ला यावर बोलू..."

बाबुची आई, "मला माहीत आहे माझ्या पोराने काही केलं नसेल... तुम्हीच काय तरी खोड काढली असेल..."

प्रिन्सिपल सर, “सगळे शांत बसा, मेघना तू सांग काय झालं ते...”

मेघनाने त्यांना पार्टीत घडलेली पूर्ण घटना सांगितली.

हे सगळं ऐकल्यावर सगळयांनाच धक्का बसला अगदी बाबुच्या आईला देखील. मग भानावर येऊन बाबुच्या आईने बाबुला खूप मारलं, ”माफ कर पोरी ह्याच्या बाजुने मी तुझी माफी मागते.”

मेघना, “काकू तुम्ही माफी नका मागू आणि यांना मारू देखील नका कारण यांना शिक्षा मी कालच केली आहे आणि त्यानंतर मला नाही वाटत ते पुन्हा कोणत्याही मुलीची छेड काढतील. हो ना...?” असं म्हणून तिने आपली एक भुवई उंचावून सर्व मुलांकडे पाहिले.

तसे सर्वजण हो… हो करत माना हलवू लागले.

मुलांची ती प्रतिक्रिया बघून आजुबाजुला असणारी माणसे हसू लागली.

“खरंच तुझ्यासारखं प्रत्येक मुलीने असलं पाहिजे, तू असं का नाही करत आपल्या कॉलेजमधल्या मुलींना सेल्फडिफेन्स करायला शिकव.” प्रिंन्सिपल म्हणाले.

“सॉरी सर पण मी हे नाही करू शकत.”

“पण का……?”

“कारण यापेक्षाही खूप मोठी जबाबदारी माझ्यावर आहे” एवढं म्हणून मेघना तिथून गेली.

प्रिन्सिपलांच्या खोली बाहेर येताच रामने मेघनाला हाक मारली,

“काय झालं राम”

“तू आमच्याशी खोटं का बोलली” तेवढ्यात सगळा ग्रुप तेथे आला, सगळ्यांच्या चेहऱ्यावर तोच प्रश्न होता.

“याच उत्तर मी देतो” असं म्हणत किशनमध्ये आला.

“मेघनाच्या अशा वागण्याने तिला बऱ्याच कॉलेजमधून काढण्यात आलं होतं येथेही तेच होऊ नये म्हणून हे नाटक आम्ही केलं.”

मेघना हात जोडून बोलली, “मी जर तुम्हाला दुखावलं असेल तर माफ करा.”

“मेघना तू तो डायलॉग ऐकला आहे का?”विज्या.

“कोणता...?”

“दोस्ती में नो सॉरी, नो थँक्यु”

विज्याच्या या वाक्यावरून सगळे खूप हसतात.

त्या घटनेला काही दिवस उलटून गेले, तरीही रामला किशनशी त्याचं मेघनावर असलेल प्रेम कसं सांगावं हे सुचत नव्हतं... तरी एक दिवस हिंमत करून त्याने किशनला फोन लावला...

“Hallo… किशन तुझ्याशी महत्त्वाचं बोलायचं होतं.” राम

“हा बोलना” किशन

“फोनवर नाही, भेटून”

“कुठे”

“नेहमीच्या ठिकाणी, अर्ध्यातासात”

“ठीक आहे.” थोड्यावेळात दोघेही तेथे पोहचले.

राम आणि किशनचं नेहमीचं ठिकाण म्हणजे त्यांच्या शहराबाहेरून वाहणारी नदी आणि नदीच्या किनारी असणारं वडाचं झाड... सायंकाळी ५ वाजल्यानंतर त्यावडाच्या झाडाखाली बसले की खूप छान वाटायचं. आजुबाजुला असणारी शांतता

आणि वरती असणारी झाडाची थंड सावली आणि समोर नदीच विहंग दृश्य आणि त्यात हळूहळू अस्ताला जाणारा सूर्य अस्वस्थ मनालाही शांत करी...

पण अशा वातावरणात देखील रामचं अस्वस्थ मन शांत होत नव्हतं.

किशन रामला पाहून बोलला, "बोल काय म्हणतोस."

राम त्याच्यापासून लांब जात म्हणाला, "किशन ते... कस सांगू हेच कळत नाही..."

"हे बघ हे आढे वेढे घेण बंद कर आणि जे काही आहे ते स्पष्ट बोल..."

एक मोठा श्वास घेत, "किशन ते... माझं मेघनावर प्रेम आहे."

"काय बोललास... माझ्याकडे बघून बोल"

"हेच की माझं तुझ्या बहिणीवर प्रेम आहे हे बघ तू रागाऊ नकोस, तुला जर पटणार नसेल तर मी नाही तिला कळू देणार."

"तू काय वेडा झाला काय... मला का नाही आवडणार...उलट मी तिच्यासाठी खूप खुश आहे"

“चल मग तिला आता जाऊन सगळ सांगतो...”

“नाही राम ऐक माझं आत्ता तिला नको काही सांगू.”

“पण का?”

“तिने तिच्या बाबांसाठी लग्नं न करण्याचा निर्णय घेतला आहे. आधी तू तिला समजून घे, मैत्री वाढव, तिच्यामनात काय आहे हे जाणून घ्यायचा प्रयत्न कर.”

“ते कसं”

“मी मदत करेन ना तुला, आता चल घरी जाऊ.“

त्यानंतर कॉलेज, सुट्टीत फिरायला जाणे, पिकनिक, पिक्चर बघायला जाणे, पार्टी करणे, अधून मधून प्रोजेक्ट्स करणे यामध्ये वेळ निघून जात होता...

राम आपल्या डोळयांनी... कधी नकळत घडणाऱ्या स्पर्शाने… तर कधी हावभावातून तिला सांगण्याचा प्रयत्न करत होता पण त्याचा काहीही फायदा नव्हता.

या सगळयात त्याला एक गोष्ट चांगलीच समजली ती म्हणजे मेघना कधीच किशनला एकटं सोडत नव्हती, ती सतत त्याच्या

सोबत असायची. तिला कधी एकटीला भेटायला बोलावलं तर ती नाहीच म्हणायची.

एके दिवशी त्याने तिला आणि किशनला घरी जेवायला बोलावले. घरच्यांना तर आधीच सर्व माहीत होतं.

**रामच्या घरी,**

रामची आई मेघनाला आणि किशनला गेट बाहेर उभं राहिलेलं बघून बोलली, "या पोरांनो आत या असं बाहेर का थांबलाय...... राम, राम बाहेर ये बघ कोण आलं आहे."

राम बाहेर येतो तेव्हा मेघना गेटमधून आत येत होती आज तिने पूर्ण पांढ-या रंगाचा अनारकली ड्रेस घातला होता आणि केसांमध्ये पांढ-या रंगाचा बेल्ट लावून बाकिचे केस मोकळे सोडले होते त्यात तिच्या गालावर पडणाऱ्या खळीमुळे ती खुपच सुंदर दिसत होती. रामची नजर तिच्यावरुन हलतच नव्हती.

मागून दाजींचा हात खांद्यावर पडताच राम भानावर आला.

रामची आई, "बसा पोरांनो, पंधरा मिनिटात जेवन तयार होईल, राम तोपर्यंत मेघनाला घर दाखव किशन काय येतच असतो अधून मधून."

राम, "चल मेघना"

मेघना किशनकडे बघून बोलते, "आलेच मी"

राम एक एक करून मेघनाला त्याच घर दाखवत होता, आधी देवघर, किचन, बाकिच्च्या खोल्या आणि शेवटी तो तिला स्वतःच्या खोलीत नेतो.

राम, “आवडलं का घर आमचं...”

“हा खूप छान आहे...” ती त्याच्या खोलीत इकडे तिकडे पाहत होती.

“मग येशील कायमची रहायला...”

मेघनाचं त्याच्या बोलण्याकडे लक्ष नव्हतं.

“मेघना... मेघना...”

अचानक कोणत्यातरी विचारातून बाहेर आल्यागत... “ हा, काही म्हणालास का तू...”

तो पुन्हा काहीतरी बोलणार तेवढ्यात आईचा आवाज ऐकू आला, “ काही नाही, चल जेवायला जाऊ...”

मेघना, “हा चल...”

तेवढ्यात चुकून रामच्या हाताचा स्पर्श तिला झाला. पण तिने काहीच रियॅक्ट केल नाही. पण रामच्या ह्रदयात जोरात धकधक सुरू झाली. तो तिला सॉरी म्हणाला आणि दोघेही बाहेर आले.

सगळ्यांच जेवण झालं, जेवण झाल्यावर थोडा वेळ सगळ्यांनी गप्पा मारल्या.

मेघना, “बर काकू निघतो आता आम्ही.”

“नीट जा, आणि गाडी हळूच चालवा...”

## दुसऱ्या दिवशी,

कॉलेजमध्ये सगळा ग्रुप एकत्र बसून गप्पा मारत होता पण त्यात मेघना नव्हती.

आज्या, “राम मला वाटतं तू आता तिला डायरेक्ट प्रपोज करावं. जे काय होईल ते बघू.”

विज्या, “होना किती दिवस इनडायरेक्टली सांगणारं, असं कर तू तिला एकटीला घेऊन जा कुठेतरी.”

आज्या, “अरे पण ती किशनला सोडेल तर ना...”

हे ऐकताच रामला थोडासा राग आला... त्याची नजर शेजारी उभा असलेल्या किशनकडे गेली... आणि त्याची खाली गेलेली नजर त्याला सहन होत नाही.

“काहीही काय बोलतोस तू आज्या ... बोलण्याआधी जरा विचार करत जा...”

आज्या, “ऐकायला विचित्र वाटलं तरी हेच खरं आहे.”

किशन, “हे बघ राम मला नाही वाईट वाटलं त्याच्या बोलण्याचं ... आणि तू यासगळ्याचा विचार नको करू, मलाही हेच वाटतं आता तुला तिला प्रपोज करायला पाहिजे. पण डायरेक्ट नको सांगू आधी आपण काहीतरी प्लॅन करू.”

राम, “किशन तुला तर माहितीच आहे मी जरी तिला एकटीला बोलावलं तरी ती तुला सोडुन येणार नाही...”

किशन, “मग काय करायचं...”

राम, “मग आपण असं करू पुढच्या आठवड्यात NSS चा कॅंप होणार आहे टेकडीवर, तिथे तिला एकटीला भेटून असं प्रपोज करतो, की ती नाही म्हणणारच नाही.”

“ठीक आहे मग ठरलं तर” असं सगळे एकदम म्हणाले.

कॅंम्प हा एक जुन्या किल्ल्यामध्ये होता... त्या ऐतिहासिक वास्तुची साफसफाई करायची होती... त्या किल्ल्याच्या भोवती एक जंगल होते आणि तिथे आजुबाजुला शक्यतो कुणाचा वावर असेल असं वाटत नव्हतं...

सगळे जण ठरलेल्या जागी पोहोचले, साफसफाई करून टेंट लावले.

तिथे अजूनही काही वेगवेगळी माणसे दिसत होती. बहुतेक ती ही कॅंपसाठी आली असतील.

नंतर वेगवेगळे कार्यक्रम झाले. सगळयांनी जेवण केलं.

मॅडमने मुलांना सांगितलं, “४ वाजलेत तुम्हाला कुठे जायचं असेल तर जाऊन या, लक्षात ठेवा अंधार पडायच्या आत सगळे इथे हजर रहा.”

ठरल्याप्रमाणे सगळं चाललं होतं. राम तयारी करायची म्हणून निघून गेला. किशन आळस देत म्हणाला, “मला झोप लागली आहे मी जरा झोपतो.” असं म्हणून टेंटमध्ये जाऊन झोपला.

ठरलेल्या प्लॅननुसार १५ मिनिटांनी आज्या धापा टाकत मेघनासमोर उभा राहिला,“राम कुठेच सापडत नाही मेघना.”

“अरे तू निट बघितलं नसशील, इथेच कुठेतरी असेल तो...”

तेवढ्यात दुसऱ्या बाजुने विजय आला, त्याच्या चेहऱ्यावर ही काळजी स्पष्ट दिसत होती, “मेघना तो खरं बोलतोय मी ही पाहिलं तो कुठेच नाही...”

मेघनाचा चेहरा आता मात्र पूर्ण पडला आणि ती गंभीर होऊन म्हणाली, “अरे तुम्ही काय बोलताय कळतंय का तुम्हाला...”

आज्या, “अगं खरंच मी आजुबाजुला सगळीकडे पाहिलं.”

मेघना स्वतःला सावरत, “तुम्ही दोघं आधी शांत व्हा, आपण पुन्हा त्याला शोधुया...”

विज्या, “आपण एकत्र जाण्यापेक्षा वेगवेगळे जाऊ, म्हणजे तो पटकन सापडेल...”

लक्ष नसणाऱ्या मेघनाला हलवत विज्याने विचारले, “मेघना तू ठीक आहेस ना...”

“हा...”

“मग असं करू मी इकडे जातो, आज्या तू तिकडे जा आणि मेघना तू पुढे बघ” असं म्हणत आज्या आणि विज्या आपापल्या वाटेला निघून गेले.

मेघनाच्या डोक्यात जे विचारांच चक्र चालू होतं त्याच प्रतिबिंब कुठेतरी तिच्या चेहऱ्यावर दिसत होतं... तरी स्वतःला थोडं सावरत ती रामला शोधण्यासाठी त्याला आवाज देत पुढे चालली होती.

काही अंतर पार करताच जंगल सुरु झालं ती तशीच पुढे चालत राहिली... आजुबाजुला नजर फिरवत ती पुढे चालत होती... इकडे तिकडे बघत रामला आवाज देत होती पुढे अचानक तिच्या

डोक्यावर एकदम खुप फुले पडायला लागली...तशी ती थोडी घाबरली पण समोर रामला बघताच तिच्या चेहऱ्यावर एक स्माईल आली.

तो गुलाबाच्या फुलांच्या पाकळ्यांनी भरलेल्या बदामी आकारात एका गुडघ्यावर बसलेला होता तेही हातात गुलाबाचे फुल घेऊन... ती काहीही न बोलता त्याच्या जवळ गेली, ती जशजशी जवळ येत होती तशी त्याच्या हृदयाची धडधड वाढत होती... ती आली म्हणून चेहऱ्यावर एक गोड स्माईल पण तिचं उत्तर काय असेल म्हणून मनात भीती... पण तिचं उत्तर काही असलं तरी आज तिला विचारायचंच असा निर्धार मनाशी पक्का केला होता.

ती जवळ येताच रामने तिचा हात हातात घेतला आणि म्हणाला, “मेघना खूप दिवसांपासून मला तुला काही सांगायचं होतं... मी अनेकदा प्रयत्न केला पण काहीन काही कारणास्तव ते राहून गेलं... पण आज मी तुला ते सांगणार आहे... मेघना ऽऽऽ माझं तुझ्यावर खूप प्रेम आहे...I LOVE YOU... अगदी तेव्हापासून जेव्हा तुझी पार्टीत मला नव्यानेच ओळख झाली...मी खरंतर

तेव्हाच तुला सांगणार होतो पण किशन म्हणाला थोडे दिवस थांब...”

थोडावेळ सगळंच शांत होतं, ती काहीच बोलत नव्हती, तो तिच्या चेहऱ्यावरून, डोळयांवरून तिचं उत्तर समजून घेण्याचा प्रयत्न करत होता पण त्याला काहीच समजत नव्हतं. ती एखाद्या पुतळ्यासारखी उभी होती...

“मेघना... मेघना... काहीतरी बोल ना... अशी गप्प का?”

मेघना काही न बोलताच निघून गेली. राम मात्र जाणाऱ्या मेघनाच्या पाठमोऱ्या आकृतीकडे बघत राहिला.

मेघना किशनच्या टेंटपाशी आली तिथे किशनला झोपलेलं पाहून तिला खूप बरं वाटलं. तेवढ्यात एक माणूस तेथे आला त्याने तिच्या हातात चिठ्ठी देली... ती वाचल्यानंतर ती लगेच त्याच्या पाठीमागून जंगलात गेली... थोडंसं अंतर पार करताच ती अशा ठिकाणी पोहचली जिथे २०-२५ लोकं हातात शस्त्रं घेऊन उभी होती...

तिथे जाताच त्यातील ती सर्व लोकं एकत्र खाली वाकली आणि मेघनाला नमून नमस्कार केला आणि दबक्या आवाजात म्हणाले, "सेनापती मेघना की जय..."

मेघनाने आजुबाजुला बघितले, "मला इथे का बोलावलं आहे... आणि तुम्ही हातात शस्त्रं घेऊन का उभे आहात... तुम्हाला असं कोणी बघितलं तर किती मोठा प्रोब्लेम होऊ शकतो याची कल्पना आहे का तुम्हाला..."

त्यातील एक जण पुढे येऊन बोलू लागला, "माफ करा सेनापती पण तुम्ही थोड्यावेळापूर्वी जेव्हा जंगलात गेला होता तेव्हा असं काही घडलं की आम्हाला शस्त्रांचा वापर करावा लागला..."

"काय घडलं मी नसताना...?" मेघनाचा स्वर थोडा गंभीर झाला.

"तेच सांगायला तुम्हाला बोलावलं आहे सेनापती, तुम्हाला माहीत असणं गरजेचं आहे"

"पटकन सांगा काय झालं ते..."

“सेनापती राजपुत्रांच्या जेवणात कोणीतरी झोपेचं औषध मिसळलं होतं. काही लोकं त्यांना उचलून घेऊन जात होते. आम्ही वेळेवर पाहिले म्हणून वाचले. आम्ही त्यांना पुन्हा टेंटमध्ये नेऊन ठेवलं. पण त्यांना जाग आली नाही. तपास केल्यावर समजले त्यांनी जेवणातून झोपेच्या गोळया खाल्ल्या आहेत.”

“काय... झोपेच्या गोळया... कोणी केलं हे तुम्ही पाहिलं का...?”

“नाही...”

“तुमचे खूप आभार, आज तुमच्यामुळे राजकुमारांचा जीव वाचला...”

“आभार कसले त्यात त्यांचा जीव वाचवणे आपल्या सर्वांची जबाबदारी आहे.”

मेघना, “पण इथून पुढे आपल्याला जास्त काळजी घ्यावी लागेल कारण त्यांना आता राजकुमार कोण आहेत हे कळलं आहे आणि आतायुद्ध सुरू व्हायला एकच महिना शिल्लक आहे.”

“तुम्हाला आता जायला पाहिजे नाहीतर शंका येईल कोणालातरी, आणि तुम्ही काही काळजी करू नका आम्ही

नेहमीच तुमच्या आजुबाजुला असू ... आम्ही असेपर्यंत तुमच्या आणि राजकुमारांच्या केसालाही धक्का लागून देणार नाही...”

मेघना लगेच किशनच्या टेंटपाशी गेली तिथे किशन अजून झोपलेला होता, तिची आत जायची हिम्मत होत नाही, “माफ करा मला राजकुमार, आज माझ्या एका चुकीमुळे तुमची अशी अवस्था झाली, पण मी वचन देते इथून पुढे अशी चूक नाही होणार...”

तेवढ्यात तिचा हात मागे घेचला गेला, रागाच्या भरात तिने तिचा हात उगारला पण पुढे रामला बघून तिने हात खाली घेतला...

“तुझं उत्तर काय आहे मेघना?”

“नाही... ऐकू आलं नाही परत सांगते नाही...” मेघना खूप चिडलेली होती. तिला या क्षणी स्वतःचा खूप राग येत होता, आणि हा राग कुठेतरी रामवर निघत होता.

राम, “पण का... ”

“मला या विषयावर काहीच बोलायचं नाही”

“नाही मला कळलं पाहिजे तुझा नकार का आहे.”

“मला तू आवडत नाहीस... कळलं. आणि आता माझा विचार करणं सोडून दे.” असं म्हणून मेघना तिथून निघून गेली.

त्या दोघांच्या आवाजामुळे किशनला जाग आली आणि रागात निघून जाणाऱ्या मेघनाकडे बघून तो बाहेर आला, “काय झालं हिला अशी का गेली.”

तेवढ्यात तेथे आज्या आणि विज्यादेखील आले...

राम काहिच उत्तर देत नाही... त्याच्याकडे बघत विज्या बोलला, “किशन तुला याच्या चेहऱ्यावरून कळलं नाही, तुझा बॉडिगार्ड नाही म्हणाला ते रामला...”

यावर कोणाला काय बोलावं हेच कळत नव्हतं...

**दुसऱ्या दिवशी राम घरी येताच,**

“आई मस्त पैकी चहा कर,”

“काय झालं राम काही टेंशन आहे का ?”

“नाही अगं काही नाही, मी खोलीत चाललोय तिथेच घेऊन ये...”

“राम... तुला भेटायला कोणीतरी आलंय... तुझ्या खोलीत आहेत.”

“कोण आहे...”

“तुच जाऊन बघ कोन आहे ते...”

राम खोलीत गेला त्याच्यासमोर उभ्या असणाऱ्या व्यक्तीला बघून रामला खूप आनंद झाला आनंदाच्या भरात त्याने जाऊन त्यांना मिठी मारली... ती व्यक्ती म्हणजे शिवनगरीचा राजा आदित्य होता...

“दादासाहेब...”

“राजकुमार...”

असे म्हणून दोघांनीही एकमेकांना मिठी मारली.

राम दुसरा तिसरा कुणी नसून राजा आदित्यचा छोटा भाऊ आणि शिवनगरीचा राजकुमार होता...

“दादासाहेब तुम्ही इथे तुम्हाला कोणी पाहिलं तर गडबड होईल...”

“आधी तुम्ही सांगा, तुम्ही विष्णुनगरीच्या राजकुमाराला कृष्णाला मारलं की नाही... “

“नाही अजून...”

“का पण...”

"तुम्हाला तर माहीत आहे दादासाहेब आपल्याला २४ वर्षे लागली हे कळायला की विष्णुनगरीचा राजकुमार कृष्णा म्हणजे किशन आहे ते... त्यानंतर त्याला मारणं माझ्यासाठी मोठी गोष्ट नाही पण... आपण त्याला मारलं आहे असा एक जरी पुरावा त्या राज्यातील लोकांना मिळाला तर ते तो युद्ध समितीला दाखवून युद्ध थांबऊ शकतील आणि असं करून ते युद्ध न करता जिंकू शिकतील... आणि आम्हाला हेच नको आहे... म्हणून त्याला मारायचे असेल तर प्लॅनिंग करून मारावे लागेल... असं की कोणीही आपल्यावर बोट ठेऊ शकणार नाही..."

"मला सगळं मान्य आहे पण तुम्हीच म्हणाला होता की आज काम होईल, पूर्ण प्लॅन तयार आहे"

"काम झालं असतं पण आम्हाला हे माहीत नव्हतं की मेघना सोडून अजून काही लोकं त्याचं रक्षण करतात ते......आम्हाला थोडा वेळ द्या दादासाहेब"

"वेळच तर नाहीये राजकुमार... तुम्हाला तर माहितीच आहे...त्या लोकांनी कसं गुप्तपणे सेवक पाठवून आपले बाबा आणि काकांचा खून केला ते... तेव्हा आपल्याला किती दुःख झालं

असेल याची कल्पना देखील त्या राणीला करता येणार नाही... तेच तिला कळावं म्हणून मी तेव्हाच वचन घेतलं होतं की त्या राज्याच्या राजकुमाराला पुढचे युद्ध सुरू होण्याआधीच मारेल... आणि येथे ही आमचं नशीब आडवं आलं असं समजा. आमच्या वचनाबद्दल तिला समजताच तिने नवीन योजना आखली... राजकुमाराला १० वर्षांचा होईपर्यंत राजवाड्यात बंदिस्त ठेवलं... तरीही आम्ही त्यांच्यावर वार केला पण वाचले ते... नंतर मला आपल्या गुप्तहेरांकडून कळालं होतं राणीने तिच्या पुत्राला आमच्यापासून वाचवण्यासाठी प्रत्येक वर्षी वेगवेगळ्या शहरात वेगवेगळ्या शाळेत ठेवायचा निर्णय घेतला ... आणि प्रत्येकवेळी ते कुठे आहेत ही गोष्ट खुपचं गुप्त ठेवण्यात आली. मी खूप प्रयत्न केला पण त्यांचा शोध नाही लागला... म्हणून मी आपल्या राज्यातील काही मुलांना जे तुमच्याच वयाचे आहेत त्यांना देशातील महत्त्वाच्या वाटणाऱ्या कॉलेजात शिकायला पाठवलं... आणि तुम्हाला या कॉलेजमध्ये... आणि माझा शोध संपला... आता एकच महिना आहे माझं वचन पूर्ण करण्यासाठी..."

“हो दादासाहेब मी नाही विसरलो, म्हणून तर मी त्याच्याशी मैत्रीचं आणि मेघनाशी प्रेमाचं नाटक केलं. मी कॅंपला गेलतो तेव्हा पूर्ण प्लॅन तयार होता पण...”

“पण काय राजकुमार...?”

“पण त्याच्या रक्षणासाठी अजून काही लोकं आहेत, हे माहीत नव्हतं. दादासाहेब तुम्ही काळजी करू नका, लवकरच मी तुम्ही घेतलेली शपथ पुर्ण करेल.”

काही दिवस असेच निघून गेले.

आत्तापर्यंत पूर्ण कॉलेजला समजलं होतं की मेघना सतत किशनच्या मागे असते. त्याला एकट्याला सोडत नाही. म्हणून पूर्ण कॉलेज आता त्या दोघांनाही चिडऊ लागलं होतं... मेघनाला मुलं बॉडीगार्ड म्हणून चिडवत होती पण ती या गोष्टी मनाला लावून घेत नव्हती पण किशनला या गोष्टी आवडत नव्हत्या...

किशन मेघनाला स्वतःपासून लांब ठेवण्याचा खूप प्रयत्न करत होता पण त्याचा काहीच उपयोग होत नव्हता... त्यामुळे त्याची सतत वरचेवर चिडचीड होऊ लागली...

असंच एके दिवशी कॉलेजमध्ये ग्राऊंडवर मेघना किशनच्यामागे चालली होती... किशनकडे बघून हे तरी नक्की होतं की तो आजही रागात होता आणि ती त्याचा राग घालवण्याचा प्रयत्न करत होती...

"असं माझ्यावर रागावून काहीच उपयोग होणार नाही, मी तुम्हाला एकट्याला सोडणार नाही... तुम्हाला कळत कसं नाही तुमच्या जीवाला धोका आहे..."

"हे बघ आधी तू माझा पाठलाग करणं थांबव... आणि मला एकट्याला सोड माझं रक्षण मी स्वतः करायला समर्थ आहे..."

"नाही आधी तुम्ही कुठं जाणार आहात ते सांगा"

किशन रागात "हे विचारणारी तू कोण" असं म्हणून पुन्हा चालायला लागला.

मेघना, "तुम्हाला माहीत आहे मी कोन आहे ते..."

किशन जोरात ओरडून, "हो माहीत आहे ना मला, तू एक नोकर आहेस माझी... फक्त एक नोकर."

हे ऐकताच मेघना दोन पावले मागे झाली आणि स्वत:ला सावरत पुन्हा बोलू लागली, “हो नोकर आहे मी आणि हे मी विसरली नाही, आणि जर तुम्हाला सांगायचं नसेल की तुम्ही कुठे चालला आहात तर नका सांगू, मी तुमच्या सोबत येणार, ते माझं काम आहे.”

“खबरदार माझ्यामागे आलीस तर... मी आदेश देतो जोपर्यंत मी नाही म्हणत तोपर्यंत तू तुझं तोंड मला दाखवणार नाही.”

असं म्हणून किशन निघून गेला आणि मेघना तिथेच उभी राहिली तेवढ्यात तिची नजर लांबून हा सगळा प्रकार पाहणाऱ्या रामकडे गेली... ती त्याच्याकडे पळत गेली.

“राम प्लिज माझं एक काम करशील.” ती हात जोडून विनंती करू लागली.

“तू हात नको जोडू मेघना मी काय करू बोल...” तिचा जोडलेला हात खाली करत राम म्हणाला.

“ते खूप रागात गेलेत प्लिज त्यांना एकटं सोडू नको, आणि समजावून घरी आण.”

“तू काळजी करू नको, मी बघतो.” राम खूप खुश होता इतक्या दिवसात शोधत असलेली संधी आज चालत त्याच्याकडे आली होती. आज ह्याला मी नाही सोडणार असा विचार करत बाईकवर बसला. त्याने बाईक सरळ रस्त्यावरून चालणाऱ्या किशन शेजारी थांबवली, “चल बस.“

“राम मला एकट्याला सोड...” किशन

“हे बघ मी तुझा नोकर नाही तू म्हणशील तसं वागायला. त्यामुळे सांगतोय तसं कर गपगुमान गाडीवर बस.”

तोही बसला. रामने बाईक त्यांच्या नेहमीच्या ठिकाणी थांबवली.

दोघेही बराच वेळ तेथील वाहणाऱ्या नदीच्या संथ पाण्याकडे बघत बसले.

राम, “किशन, तुला या पाण्याकडे बघितल्यावर काय वाटतं.”

किशन, “खूप शांत, असं वाटतं की पाहतच रहावं.”

“का”

“का म्हणजे, पाणी स्वच्छ आहे, निर्मळ आहे, आणि कसं संथपणे वाहत आहे.

“हे पाणी वाहत आहे म्हणून त्यात कोणतीच घान नाही, म्हणून हे स्वच्छ आणि हवंहवंसं वाटणार आहे. त्या जागी जर इथं एखादं डबकं असतं तर साचलेल्या पाण्यामुळे कितीतरी घान साचून राहिली असती आणि त्यामुळे पाणी अशुद्ध आणि त्रासदायक झालं असतं, बरोबर ना...”

“हो मला कळतंय मी मेघनाशी असं बोलायला नको होतं. सॉरी...”

“तुला असं वाटतंय की मी तिच्यासाठी इथे आलोय... तुझं आणि तिचं काय झालं मला माहीत नाही आणि मला ते जाणूनही घ्यायचं नाही..”

“मग...”

“मी इथे माझ्या मित्राला आणि त्याहीपेक्षा जास्त माझ्या भावाला जो त्रास होतोय तो समजून घ्यायचा प्रयत्न करत आहे...”

“मला काही नाही झालंय.. ते आज्या तिला माझी बॉडीगार्ड म्हणाला म्हणून थोडा राग आला बाकी काही नाही...” स्वत:चा चेहरा त्याच्यापासून लपवत किशन बोलला.

“मला आत्तापासून नाही तर कॉलेज सुरू झाल्यापासून वाटतंय की तू काहीतरी लपवतोय ... मला वाटलं आपली मैत्री तेवढी पक्की नाही असं तुला वाटत असेल... तेव्हापासून आत्तापर्यंत हाच प्रयत्न करत होतो की तू तुझ्या मनातलं माझ्याशी बोलशील... किशन मला असं वाटतंय की आजही मला ते जमलं नाही...चल आपण जाऊया घरी...”

“थांब राम...”

“थांबून काय उपयोग किशन जर तू तुझं मनही माझ्यासमोर मोकळं करणार नसशील तर...मी थांबण्याचा उपयोग काय...” रामने चालायला सुरुवात केली...

“थांब राम, आत्ता माझ्या मनात काय चाललंय हे जाणून घेण्यासाठी तुला आधी मी कोण आहे हे माहीत पाहिजे.”

“मला फक्त एवढंच माहीत आहे तू किशन आहेस माझा मित्र...”

“आज तुला सगळं सांगतो राम मी तुझा मित्र आहे हे खरं आहे पण माझं नाव किशन आहे हे खोटं आहे...” असं म्हणून किशनने त्याचा चेहरा रामच्या विरूद्ध दिशेला केला.

“काय... मग काय आहे तुझं खरं नाव...?” हे म्हणताना मात्र रामच्या चेहऱ्यावर स्माईल होती.

आज काहीही झालं तरी किशनकडून हे कबूल करून घ्यायचं की त्याच्या आईने धोक्याने माझ्या वडिलांना आणि काकांना मारले आणि मग ते काम करायचं ज्यासाठी किशनबरोबर मैत्रीचं खोटं नाटक केलं असा निश्चय रामने मनामध्ये केला.

किशन, “त्याआधी तुला काही माहीत हवं ते म्हणजे...” किशनने रामला विष्णुनगरी आणि शिवनगरीची सगळी कहाणी सांगितली अगदी राजा आदित्यने घेतलेल्या शपथेपर्यंत...”

राम, “एक मिनिट म्हणजे तुझं नाव कृष्णा आहे, तू विष्णनगरीचा होणारा राजा, तुझे बाबा युद्धात मारले गेले आणि राजा आदित्यचे बाबा आणि काका यांनी युद्धात एका स्त्रीमुळे आपण युद्ध हरलो या जाणिवेमुळे आत्महत्या केली.”

“हम्म...”

“म्हणजे त्यांचा खून झाला नव्हता तर त्यांनी आत्महत्या केली होती.”

“खून...हे तू काय बोलतोय राम...”

राम चाचरत, "अरे...माझा एक मित्र होता शिवनगरीचा तर त्याने सांगितलं की तुझ्या मातोश्रींनी राजा भैरवसिंग आणि त्यांच्या बंधूंचा खून करवून घेतला."

"एक मिनिट म्हणजे तुला शिवनगरी आणि विष्णुनगरी बद्दल माहिती आहे...पण कसं… तू मला काहीच नाही सांगितलं...?"

"हे बघ आत्ता ते महत्त्वाचं नाही तू आधी मला मी विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर दे..."

"नाही, मातोश्री असं का करतील उलट त्यांनी धोक्याने माझ्या बाबांना मारले तरीही त्यांनी एकही अपशब्द वापरला नाही, आणि आम्हाला ही वापरू दिला नाही."

काहीतरी गडबड आहे, किशन आणि दादासाहेब या दोघांपैकी एक जण खोटं बोलतोय पण कोण...?

असा राम मनात विचार करतच होता तेवढ्यात किशन बोलला,

"कसला विचार करत आहेस राम"

"काही नाही तू पुढे सांग..."

“त्यानंतर मला कधी राजवाड्याबाहेर पडू दिलं नाही... माझं जे काही शिक्षण झालं ते राजवाड्यात मला काही कळत नव्हतं की असं का होतं आहे...

मी दहा वर्षांचा होईपर्यंत मातोश्रींना समजलं की माझा या लढाई करण्यात राज्य कारभार करण्यात काहीच इंटरेस्ट नाही...

त्यांनी माझ्यावर कधीच जबरदस्ती केली नाही, याउलट त्यांनी माझ्या मोठ्या बहिणीला प्रशिक्षण द्यायला सुरुवात केली.

मी दहा वर्षांचा असताना राजवाड्यात माझ्यावर जिवघेणा हल्ला झाला. मातोश्रींना समजलं की मी इथे ही सुरक्षीत नाही मग त्यांनी मला आमच्या राज्याच्या बाहेरील राज्यात एका वेगळ्या ओळखीवर शाळेचा दाखला मिळवून दिला.

प्रत्येक वर्षी नवीन शाळा, नवीन ओळख, रक्षणासाठी नवीन सेवक, कंटाळलो रे मी या सगळ्याला... म्हणून कोणी माझं मित्र झालंच नाही... म्हणून यावर्षी मी ठरवलं तुम्हाला सोडून कुठे जायचं नाही...

पण आईसाहेबांनी एक अट घातली की मेघना माझी बॉडीगार्ड म्हणून माझ्यासोबत राहील. मला ती अट मान्य करावी लागली.

मेघना ही तिच्या वडिलांची एकुलती एक मुलगी तिचे वडील हे आमच्या राज्याचे सेनापती होते पण त्यांचं वय झाल्यामुळे ही

जबाबदारी मेघनावर आली आणि आता ती आमच्या राज्याची सेनापती झाली आणि म्हणूनच राज्याचा होणाऱ्या राजाचं रक्षण करणं ही तिची जबाबदारी आहे म्हणून तिने माझं सगळकाही ऐकून घेतलं.

ती खूप चांगली आहे मला वाटलं की तुझ्याशी लग्नं झालं तर ती या जबाबदारीतून सुटेल पण ती तयारच नाही.”

रामने किशनकडे बघितलं, “तुला मरणाची भीती नाही वाटत...”

“अरे आपण मरणार आहे हे माहिती असून राज्यातील लोकांसाठी लढणाऱ्या राजाचं रक्त आहे माझ्यात ते इतकं दुबळ नाही...”

“तुला नाही बदला घ्यायचा तुझ्या बाबांच्या मृत्यूचा...त्यांनी छळ करून मारलं ना तुझ्या बाबांना...”

“नाही कारण जे काही झालं ते युद्धाच्या वेळी झालं, मला बदला घ्यायची संधी मिळाली तर मी तिथेच युद्धाच्यावेळी घेईल. अरे पुर्वजांनी दोन युद्धामध्ये २४ वर्षांचा काळ यासाठी ठेवला आहे की सगळयांनी आपापले आयुष्य जगावं...”

“तुला राग नाही येत राजा आदित्यचा, तुझी काहीही चूक नसताना त्यांनी अशी शपथ घेतली, त्यांच्यामुळे असं जगणं तुझ्या वाट्याला आलं.”

“नाही, जसं मी माझ्या बाबांना गमावलं तसं त्यांनी ही गमावलं आहे... आणि ह्या आयुष्याचं म्हणत असशील तर मी खूश आहे कारण, मी कधीतरी मरेल या भीतीने माझ्या आईने आणि बहिणीने खूप प्रेम दिलं, मी माझी स्वप्न पूर्ण केली. आणि मुख्य म्हणजे मला तुझ्यासारखा मित्र मिळाला... मी खुश आहे त्यामुळे मला रोज शांत झोप लागते...याउलट मला तर वाटतं मी कधी मरणार म्हणून त्यांना झोप लागत नसेल...” असं म्हणून किशन हसायला लागला.

“तुझी खरंच सगळी स्वप्नं पूर्ण झाली...”

“नाही रे... माझ्या आईने आणि बहिणीने त्यांची कर्तव्यतर पार पाडली, पण माझी अजून बाकी आहेत. जर मी युद्धानंतर वाचलो तर मी ती नक्की पूर्ण करेल..”

“काय करणार तू...”

“पहिल्यांदा ताईचं लग्नं, नंतर शिवनगरीचे माहीत नाही पण मी माझं राज्य शासनाच्या हवाली करणार, आणि मातोश्रींसोबत राहिलेलं आयुष्य काढणार.”

“लोकं तयार होतील का ?”

“पहिल्यांदा नाही म्हणतील विरोध करतील पण त्यांना नंतर हे कळेल की हे सर्वांसाठी चांगलं आहे.”

“बरं चल आता उशीर होतोय.” त्याचा हात धरून राम बोलला.

“एक मिनिट राम “ त्याला थांबवत किशन बोलला.

“काय...”

“मला जर काही झालं तर एकदा माझ्या बहिणीला आणि आईला भेटायला जाशील...”

“हे काय बोलतोय तू तुला काही होणार नाही...”

किशनने रामच्या खिशात कार्ड ठेवले, “हा नंबर राज्याच्या सिक्युरिटीच्या ऑफिस मधला आहे. राज्यात कुठेच मोबाईल नाही आणि नेला तरीही रेंज नाही. तू जर ऑफिसमध्ये फोन केला तर जो काही निरोप आहे तो पंधरा मिनिटात राजवाड्यात पोहचवला जाईल... हा नंबर फक्त माझ्याकडे मेघनाकडे आणि आता तुझ्याकडे आहे...”

“बरं चल आता तरी घरी, अंधार पडायला लागलाय”

“हो चल...”

रामने त्याची बाईक किशनच्या बंगल्याबाहेर थांबवली, मेघना दारातच उभी होती, किशनला बघताच ती आत निघून गेली. रामही किशनला तेथे सोडून घरी आला.

घरी येताच रामने रूममध्ये जाऊन दादासाहेबांना फोन केला,

“हॅलो.. दादासाहेब”

“हा बोला राजकुमार…...काम झालं का…… ?”

“नाही...”

“का काय झालं... तुम्ही का नाही मारलं त्यांना .”

“तुम्ही माझ्याशी खोटं का बोललात...”

“काय खोटं बोललो आम्ही.”

“हेच की आपल्या पिताश्रींने आणि काकाश्रींने आत्महत्या केली होती त्यांचा खून झाला नव्हता.”

“तुम्हाला हे कुणी सांगितलं.”

“किशनने सांगितलं...बोला दादासाहेब तुम्ही खोटं का बोललात.”

“मी खोट नाही बोललो, लोकांसाठी ती आत्महत्या असेल पण माझ्यासाठी तो खून होता विष्णुनगरीच्या राणीने केलेला खून...बस्स मला आता काही ऐकायचं नाही.” रागाच्या भरात आदित्य राजेंनी फोन ठेवून दिला.

“दादासाहेब ऐका माझं... दादासाहेब...शेट्ट फोन ठेवला.”

“म्हणजे किशन बरोबर बोलत होता हे मी काय केलं...मी त्याच्याबरोबर आणि मेघनाबरोबर मैत्रीच खोटं नाटक केलं... त्यांना धोका दिला” राम असं म्हणून जोरजोरात ओरडून रूममधल्या वस्तू इकडे तिकडे फेकू लागला.

तेवढ्यात त्याचं लक्ष दरवाज्यावर गेलं तिथ पूर्ण फॅमिली उभी होती. त्यांना बघताच त्याने आपले डोळे पुसले, “तुम्ही सगळे इथे काय करताय... मी ठीक आहे तुम्ही जाऊन झोपा.”

त्याचे बाबा, “हे बघ राम आम्ही तुझे खरे आई-बाबा नाही पण आमच्यासाठी तू आमचा मुलगाच आहेस. तेव्हा एक सांगू ऐकशील.”

“बोला ना बाबा”

“आज शांत झोप आणि उद्या फ्रेश होऊन किशनची आणि मेघनाची माफी माग.”

“ थॅंक्यु बाबा” असं म्हणत रामने त्यांना मिठी मारली.

**इकडे किशनच्या घरी,**

जेवणाच्या टेबलवर मेघनाने किशनसाठी ताट करून ठेवलं होतं आणि ती त्याची वाट बघत टेबलाशेजारी उभी होती... तेवढ्यात लांबून येणाऱ्या किशनला बघताच ती थोडी बाजूला झाली...

“मेघना हे काय एकच ताट, तुझं कुठे आहे...”

“तुम्ही घ्या जेऊन मी नंतर जेवेन...”

“नंतर नाही तू ही बस जेवायला माझ्याबरोबर...”

“माफ करा, पण तुम्हाला आवडेल का माझ्यासारख्या नोकर माणसासोबत बसून जेवायला...”

“अजून सकाळचा राग गेला नाही वाटतंय...हे बघ मेघना आय एम व्हेरी सॉरी... मला माफ कर मी सकाळी तुझ्याशी बरोबर नाही वागलो... मी कितीही रागात असलो तरी तुझा सगळ्यांसमोर अपमान करायला नको होता...”

“मला तुम्ही बोलला याचा राग नाही आला पण रागाच्या भरात तुम्ही एकटेच निघून गेलात, जर तुम्हाला काही झालं असतं तर मी बाबांना काय उत्तर दिलं असतं, राजमातोश्रींना काय उत्तर दिलं असतं... बोला.”

“माफ कर मला, इथून पुढे अशी चूक नाही होणार...”

“आणि झाली तर...?”

“तू म्हणशील ती शिक्षा भोगायला मी तयार आहे. बरं आता तरी बसशील जेवायला...”

“हा...”

“एक सांगू मेघना थोडंसं पर्सनल आहे.”

“बोला ना...”

“तू एकदा रामशी बोलायला हवं त्याचं खरंच तुझ्यावर खूप प्रेम आहे...” असं म्हणून किशन तिथून निघून गेला.

मेघना ही तिच्या रूममधे गेली. बराच वेळ विचार केला आणि रामला फोन लावला रिंग ऐकू आली आणि तेवढ्यात तिला रूमबाहेर कोणीतरी असल्याची जाणीव झाली, “कोन आहे बाहेर हॅलो कोन आहे बाहेर...”

असं म्हणत ती रूमच्या बाहेर आली. मागून कोणीतरी तिच्या डोक्यावर लोखंडी सळईने वार केला तशी ती किंचाळून खाली पडली.

तिची ती किंचाळी फोनवर हॅलो मेघना... हॅलो...म्हणत असणाऱ्या रामच्या कानापर्यंत पोचली.

त्यावरून नक्कीच काहीतरी गडबड आहे हे त्याने हेरलं आणि आज्या, विज्याला किशनच्या घरी यायला सांगितलं. आणि तो ही लगेच निघाला.

**किशनच्या घरी**

किशनच्या घरी गेल्यावर रामला बेशुद्ध पडलेली मेघना दिसली. तिच्या जवळ जाऊन तिला उठवायचा प्रयत्न केला पण ती काहीच बोलत नव्हती त्याचं लक्ष तिच्या डोक्याखालून वाहत जाणाऱ्या रक्ताकडे गेलं.

त्याने तिचा श्वास चालू आहे की बंद बघण्यासाठी स्वतःचा हात तिच्या नाकापर्यंत नेला त्याचे हात कापत होते तरीही धीर करून त्याने हात पुढे केला… तिचा श्वास चालू होता हे समजताच त्याने तिला घट्ट मिठी मारली. डोळ्यातून अश्रु पुसून त्याने मेघनाला अलगद जमिनीवर ठेऊन ॲम्ब्युलन्सला फोन केला.

फोन ठेवताच त्याला किशनची आठवण आली, “किशन.. किशन... किशन” म्हणून घरभर त्याला शोधायला सुरुवात केली.

तो त्याच्या रूममध्ये गेला त्याला पलंगाशेजारी रक्ताच्या थारोळयात पडलेला किशन दिसला... रामचे पाय डगमगले, तो घाबरत त्याच्या जवळ गेला त्याचाही श्वास चेक करण्यासाठी आपले थरथरते हात त्याच्या नाकाजवळ नेले तसा त्याने, किशनऽऽऽ असं म्हणून त्याचं डोकं आपल्या छातीला लाऊन जोरजोरात रडायला लागला.

तोपर्यंत तिथे आज्या आणि विज्या आले आणि ॲम्ब्युलन्स देखील आली. आज्या आणि विज्याने मेघना आणि किशनला ॲम्ब्युलन्स मध्ये पाठवले.

आज्या, “राम सावर स्वतःला, आपल्याला त्याच्या घरी सांगितलं पाहिजे... पोलिसांना कळवलं पाहिजेत... हे ज्याने कोणी केलंय त्याला आपण सोडायचं नाही...”

रामने स्वतःला सावरुन किशनने दिलेल्या नंबरवर फोन केला आणि सगळं काही सांगितलं. “आज्या विज्या तुम्ही दोघं हॉस्पिटल ला जा, मी मागणी येतो.”

ते दोघेही गेले, रामने मारेकर्यांबद्दल काही सापडतंय का हे पाहण्यासाठी शोधाशोध सुरू केली.

मेघनाच्या खोलीत त्याला काहीच सापडलं नाही, पण किशनच्या खोलीत त्याला एक अंगठी सापडली, अंगठी पाहून रामचे डोळे लाल झाले... त्याला आता कळलं होतं की या सगळ्यामागे कोन आहे ते. रामने ती अंगठी आपल्या हातात घट्ट पकडली आणि बाईकला किक मारली आणि स्वतःच्या घरासमोर गाडी थांबवली.

गेटमधून आत जाताच, “दादासाहेब... कुठे आहात तुम्ही बाहेर या...आम्हाला तुमच्याशी बोलायचं आहे”

“या राजकुमार या... आम्ही तुमचीच वाट पाहत होतो पण तुम्हाला कसं कळलं आम्ही आलो आहे ते... बर ते जाऊदे आम्ही आज खूप खूश आहोत...”

“किशनला मारलं म्हणून ना.”

“हो पण हे तुम्हाला कसं कळलं.”

रामने ती अंगठी त्यांच्या हातावर ठेवली, “हे असं...तुम्ही असं का केलं दादासाहेब, तुम्हाला चांगलंच माहीत होतं आपल्या

बाबांचा आणि काकांचा मृत्यू झाला त्यात त्याची काहीच चूक नव्हती तरीही तुम्ही त्याला मारलं.”

“नसेल ही पण त्याच्या पुज्य मातोश्रींमुळे आम्ही आमचे बाबा आणि काकांच्या मृतदेहाला अग्नी दिला आणि आता त्या जेव्हा त्यांच्या मुलाच्या मृतदेहाला अग्नी देतील तेव्हा आमचा बदला पूर्ण होईल... आणि आता विष्णुनगरीला हरवणं देखील सहज शक्य आहे, त्यानंतर आपल्या पुर्वजांचं स्वप्न देखील पूर्ण होईल.”

“म्हणून तुम्ही निर्दोष किशनला मारलं.”

“ते जाऊद्या तुम्ही आता तुमचं सामान बांधा आपल्याला शिवनगरीला जायचं आहे” त्यांनी त्यांचा हात पकडला. पण राम जागचा हलला देखील नाही.

“काय झालं...चला”

“तुम्ही किशनला मारलं कारण तुम्हाला युद्ध सहज जिंकता यावं. बरोबर ना...”

“तुम्हाला काय म्हणायचं आहे राजकुमार...?”

“हेच की एवढं करून देखील तुम्ही युद्ध हारणार आहात... दादासाहेब”

आदित्य राजे जोरजोरात हसायला लागले आणि एकदम शांत झाले, “असा त्यांच्याकडे कोणताही योद्धा नाही जो आम्हाला हरवू शकेल राजकुमार.”

“तो योद्धा तुमच्यासमोर उभा आहे दादासाहेब. मी हरवणार तुम्हाला. मी लढणार त्यांच्या बाजुने युद्ध.”

“तुम्हाला काय वेड लागलंय का राजकुमार, तुम्ही काय बोलतात कळतंय का तुम्हाला”

“हो वेड लागलंय... तुमच्यामुळे आम्ही मैत्रीचं आणि प्रेमाचं नाटक केलं... आणि आता तेच नाटक आम्ही खरं करणार.”

“वेडेपणा करू नका राजकुमार, त्यांना जर कळलं की तुम्ही आमचे बंधू आहात तर मारून टाकतील ते तुम्हाला...”

“जे होईल ते होईल पण आम्ही आता मागे हटणार नाही...”

“तुम्ही काय बोलताय तुम्हाला कळत नाहीये राजकुमार... तुम्ही आधी शांत व्हा...”

“नाही आदित्यराजे आता तुमचा राजकुमार मेला आणि त्याला तुम्ही मारलाय.”

“ठीक आहे तुम्हाला जे करायचं आहे ते करा. आम्ही जातो.” असं म्हणून आदित्यराजे तिथून निघून गेले.

रामचा फोन वाजला, “हा बोल आज्या...”

“मेघनाला ऑपरेशन थिएटरमध्ये नेलं आहे, तिच्या जीवाला धोका आहे राम, तू लगेच ये इकडे...”

आलोच असं म्हणून रामने फोन ठेवला आणि लगेच गाडीला किक मारली तशी गाडी हॉस्पिटल बाहेर थांबवली.

राम हॉस्पिटलमध्ये जाणार तोच वाटेत आज्या आडवा आला.

“काय झालं आज्या, काय म्हणाले डॉक्टर आणि मेघना कुठे आहे ?”

“ऑपरेशन झालं आहे तिचं, तिला ICU ते शिफ्ट केलं आहे आणि अजून चेकअप चालू आहे. मी औषधे आणायला चाललो आहे.”

“तू जा दुसऱ्या मजल्यावर आहे ICU.”

“ठीक आहे”

राम तेथे पोहचला तेव्हा विज्या इकडे तिकडे ऐरझारे मारत होता.

विज्या, “राम बर झालं तू आलास ते”

“मेघना”

विज्याने ICU कडे बोट दाखवले, रामने खोलीच्या काचेतून मेघनाला बघितले आणि त्याच्या डोळ्यातून पाणी वाहू लागले.

तेवढ्यात डॉक्टर बाहेर आले.

विज्या, “राम, हे बघ डॉक्टर बाहेर आले.”

रामने डोळे पुसले आणि डॉक्टरकडे बघितले तर तो डॉक्टर त्याचा मित्र जय होता.

राम, “जय काय झालं मेघनाला?, कशी आहे ती?, जीवाला धोका तर नाही ना?, तू गप्प का जय बोलना.”

“हे बघ तू आधी शांत हो आणि मेघना आता आऊट ऑफ डेंजर आहे पण...”

“पण... काय जय...?”

“ती कोमात गेली आहे...” हे सांगताना नुकतेच हॉस्पिटलमध्ये पोहचलेल्या मेघनाच्या बाबांच्या कानावर हे शब्द पडले त्यांचे पाय डगमगले... आणि ते खाली पडणारच तेव्हा रामने पळत जाऊन त्यांना आधार दिला...

“बाबा सावरा स्वत:ला, तिला काहीही होणार नाही...”

रामने जयकडे बघितले, “ती कोमातून केव्हा बाहेर येईल…?”

“तिच्या डोक्याला खूप मार बसलाय त्यामुळे तसं काही सांगता येणार नाही...”

तेवढ्यात एक माणूस जो मेघनाच्या बाबांबरोबर आलेला होता तो त्यांच्या कानात हळूच आवाजात बोलला, “आपल्याला जायला हवे, तिथे राणीसाहेब आणि राजकुमारी वाट पाहत असतील.”

“मेघना...” तिचे बाबा आयसियुच्या काचेतून तिच्याकडे पाहून बोलले.

“तिच्या ही जीवाला धोका आहे, आपण तिला घेऊन जाऊ...” तोच माणूस पुन्हा बोलला.

मेघनाच्या बाबांनी स्वतःचे डोळे पुसले, “डॉक्टरसाहेब धन्यवाद तुम्ही माझ्या पोरीचा जीव वाचवला, आता तिची काळजी आम्ही घेऊ...”

“म्हणजे तुम्हाला काय म्हणायचंय...” जय

“हे बघा डॉक्टर मेघनाला डिस्चार्ज द्या म्हणजे मला तिला आणि किशनला घेऊन इथून आमच्या गावी जाता येईल... मी तिला तिथल्या हॉस्पिटलमध्ये अॅडमिट करेन.”

“हे बघा काका तिची तब्येत बरी नाही. आता जर तिला शिफ्ट केलं तर तिच्या जीवाला धोका होऊ शकतो. मी तिला शिफ्ट करण्याची परवानगी नाही देऊ शकत.”

“हे बघा डॉक्टर बाप आहे तिचा मी, तिची काळजी आहे म्हणूनच तिला बरोबर इथून घेऊन जात आहे...”

“ठीक आहे पण तुम्ही अॅम्ब्युलंन्स आणि एखादी नर्स किंवा डॉक्टर घेऊन जा. आणि मी पेपर्स तयार करायला सांगतो.” जय तिथून निघून गेला.

राम, “बाबा मला किशनने म्हणजेच तुमच्या राज्याचे राजकुमार कृष्णा यांनी सगळं काही सांगितलं आहे, त्यानुसार विष्णुनगरीत कोणतेही हॉस्पिटल असेल असं वाटत नाही. मला वाटत तुम्ही एखादा डॉक्टर सोबत घ्या. तुम्ही मेघनाच्या तब्यतीचा विचार करून निर्णय घ्या.”

तेवढ्यात तोच माणूस मागून बोलला, “तुम्ही बोला मालक आपण ह्याच डॉक्टरला उचलू.”

राम, “अहो उचलायची गरज नाही मी त्याला समजावतो... मलाही तुमच्याबरोबर विष्णुनगरीला यायचं आहे, किशनचे अंतिम संस्कार होईपर्यंत त्याच्याबरोबर थांबायचं आहे. प्लिज नाही म्हणू नका...

“मला माहीत आहे तुम्ही राजकुमारांचे चांगले मित्र आहात. पण मी तुम्हाला नाही नेऊ शकत.”

“प्लिज बाबा नाही म्हणू नका, आणि हे माझ्यासाठी नाही तर किशनच्या इच्छेसाठीच म्हणत आहे मी...”

“इच्छा, राजकुमारांची...कोणती”

“किशनने वचन घेतलं होतं की जर त्याला काही झालं तर मी त्याच्या आईला आणि बहिणीला भेटावं...”

त्यांनी विचार केला, ठीक आहे चल”

रामने जयला सगळं काही सांगितलं.

जय, “मी येईन पण फक्त तुझ्यासाठी, तू आत्तापर्यंत खूप काही केलं आहे माझ्यासाठी.”

आज्या आणि विज्याने बरोबर येण्यासाठी हट्ट धरला पण रामने त्यांना समजावलं.

दोन गाड्या निघाल्या,

पहिले तिन्हीही टप्पे गुप्त मार्गाने पार पडले... पण चौथ्या मुख्य प्रवेशद्वारावर अडवले व राजचिन्ह दाखवायला सांगितले. रामने आधीच त्याचं पहिलं त्रिशूळ असलेलं चिन्ह लपवलं होतं पण दुसरं सुदर्शनचक्र असलेलं राजचिन्ह नसल्यामुळे त्यांना प्रवेश मिळाला नाही. शेवटी मेघनाच्या बाबांनी कोणतातरी कागद दाखवला. मग सगळ्यांना आत जाण्याची परवानगी मिळाली.

रात्रीची वेळ होती.

सगळे अंतिम संस्कार पार पडले. मग राम आणि जयला राजमहालात त्यांची खोली दाखवली गेली. अंधार असल्यामुळे फक्त कंदिलाच्या उजेडात त्यांना आजुबाजुचा परिसर बघता आला नाही... त्यात प्रवासामुळे आलेल्या थकव्यामुळे त्यांनी मिळालेली रुम कशी आहे हे ही न बघता ते निद्रा देवीच्या स्वाधीन झाले...

## दुसऱ्या दिवशी

सकाळी जेव्हा जयचे डोळे उघडले गेले तेव्हा त्याचा त्याच्या डोळयांवर विश्वास बसला नाही, “राम उठ... राम...”

राम आपला नेहमीप्रमाणे डोळे चोळत उठत बोलला, “काय झालं जय काय भुत भित बघितलंस की काय...”

“आधी डोळयावरचा हात काढ आणि बघ आजुबाजुला...हे काय आहे राम, आपण कोणत्यातरी राजा महाराजांच्या काळात येऊन पडलो की काय.” आजुबाजुचं दृश्य बघताच जयच्या तोंडातून हे शब्द बाहेर पडले.

“अरे यात काय एवढं आमचं राज्य ही असंच आहे की…”

“अरे हो मी विसरलोच होतो की तू ही एक राजकुमार आहेस. पण माझ्यासाठी हे सगळं नवीनच आहे ना…”

जयला आश्चर्य वाटावं ते वातावरण होतंच तसं अगदी ४००-५०० वर्षांपूर्वी जसे राजे महाराजे राहत होते तसं...

त्यांची रूम, त्यातील एक एक वस्तू मग त्यांचा पलंग असो की तेथील मेज, खिडक्या, कपाट सगळं काही लाकडांपासून बनवलेलं आणि त्यावरील सुरेख नक्षीकाम असो की... पलंगाशेजारच्या टेबलवर पाणी पिण्यासाठी ठेवलेला जार आणि

ग्लास हि तांब्यापासून बनवलेली भांडी असो... सगळं काही अप्रतिम सुंदर होतं...

“राम जर आपली रूम इतकी सुंदर आहे तर संपूर्ण राजवाडा किती सुंदर असेल, चल आपण जाऊन बघुया...”

“हो जाऊ पण अशा अवतारात... आधी तयार तर होऊ चल.”

थोड्यावेळात दोघेही जेव्हा रूममधून बाहेर पडले तेव्हा दोन सेवक त्यांच्या रुमबाहेर रखवाली करताना दिसले...

तिथून बाहेर आल्यावर त्यांची बाजूची खोली ही मेघनाची होती. तिथे तिच्या उपचारासाठी दोन आयुर्वेदिक वैद्य होते जे तिच्यावर उपचार करत होते. पुढे दोन तीन खोल्या सोडल्यावर जिना लागला. त्यावरुन खाली आल्यावर. आतल्या बाजूला खूप मोठा हॉल होता. तिथून थोडंसं पुढे गेल्यावर चार पायऱ्या उतरल्यावर आरतीचा आवाज ऐकू आला आणि अगरबत्तीचा सुगंध दरवळू लागला. तिकडे नक्कीच देवघर होते.

राम, “जय चल देवदर्शन करूया”

जय, “करू पण आधी काही तरी खाऊया खूप भूक लागली आहे. या डाव्याबाजूला पंचपक्वानांचा वास येतोय नक्कीच स्वयंपाक घर इकडे आहे.”

“बरं चल” असं म्हणत ते तिकडे जायला निघाले.

तेवढ्यात एक सेवक त्यांच्यासमोर येऊन उभा राहिला, ‘‘तुम्हाला राजदरबारात हजर करण्याचा आदेश आहे सेनापतींचा.’’

जय, ‘‘राम हे आदेश, सेनापती हे शब्द ऐकून मला तर खरंच आपण पंधराव्या किंवा सोळाव्या शतकात आलोय अस वाटतंय.’’ असं म्हणून जय स्वतःच हसायला लागला.

रामने नजरेने त्याला शांत केले. दोघेही त्या सेवकाच्या पाठीमागून चालायला लागले.

दोनच मिनिटात ते राजदरबारात पोहचले.

सरसेनापती, ‘‘सेवक त्या दोघांना राजकुमारी समोर हजर करा’’

ते जसं जसे राजकुमारीच्या जवळ जात होते, तशी पुसटशी दिसणारी प्रतिमा स्पष्ट दिसत होती.

राजकुमारींचं ते मोहक सौंदर्य, एखाद्या अप्सरेला लाजवेल अशी शरीररचना त्यात पांढरेशुभ्र वस्त्र, लांबसडक केस आणि अधून मधून चेहऱ्यावर येणाऱ्या त्या कुरळ्या बटा हे सगळं त्या सौंदर्यात भर घालत होतं...... तर डोक्यावर असलेला मुकूट आणि

चेहऱ्यावरील गंभीर भाव हे त्याची राज्यावरील निष्ठा आणि त्याच्यापरी असणारी कर्तव्याची जाण हेच दाखवत होतं.

दोघांना राजदरबारात राजकुमारी समोर उभं केलं गेलं.

राजदरबार खूप मोठा होता, दोन्ही बाजूला दरबारातील राजमंत्री तर समोर एक मोठा चौथरा, दहा पायऱ्या चढल्या की वर एक मोठं सिंहासन आणि त्याच्याशेजारी थोडंसं खालच्या बाजूला आकाराने देखील थोडं छोटंसं सिंहासन त्यावर राजकुमारी बसली होती.

सरसेनापतींनी म्हणजे मेघनाच्या बाबांनी त्यांच्या समोर झुकून त्यांना नमस्कार केला, "राजकुमारी जसं आम्ही तुम्हाला सांगितलं होतं की हा राम राजकुमारांचा कॉलेज मित्र आहे, आणि त्यांना तुमच्याशी राजकुमारांबद्दल काही बोलायचं आहे."

राजकुमारी, "बोला काय बोलायचं होतं तुम्हाला आमच्याशी"

रामने घडलेलं सगळं काही राजकुमारीला सांगितलं हे सगळ ऐकून राजदरबारातील सगळे लोकं आपापल्या तलवारी काढून राम आणि जयच्या अंगावर धाऊन गेली.

राजकुमारी, “थांबा हे काय करताय तुम्ही,”

त्यातील एक मंत्री, “माफ करा राजकुमारी पण आज ह्याच्यामुळे आपले राजकुमार आपल्यात नाहीत, आपल्या सरसेनापतींची मुलगी मेघनाची अवस्था बिकट आहे, आणि सगळ्यात महत्त्वाचं हा जर त्या राज्याचा राजकुमार आहे तर आम्ही ह्याला जिवंत सोडणार नाही.”

पुन्हा सगळे लोक त्यांच्या अंगावर धाऊन गेले.

“थांबा माझं ऐकून तर घ्या.” राजकुमारी आसनावरून उठून बोलल्या.

तेवढ्यात बाहेरून खूप मोठ मोठ्याने आवाज ऐकू आला.

“काय झालं बाहेर, ऐवढा आवाज कसला येत आहे...” राजकुमारी.

तेवढ्यात तिथे एक सेवक आला, त्याने राजकुमारीला वाकून नमस्कार केला... “ राजकुमारी बाहेर पूर्ण राज्यातील लोकं आले आहेत आपल्याला भेटायला.”

“काय झालं, काय कारण आहे, त्यांच्या असं अचानक येण्यामागे.”

“माहीत नाही फक्त फाशी द्या……फाशी द्या…… एवढंच म्हणत आहेत.”

“ठीक आहे चला आपण बाहेर जाऊन बघू...यांना ही सोबत घ्या” असं म्हणत राजकुमारी पुढे चालू लागली मागे काही मंत्री आणि राम आणि जयला धरून काही सेवक.

बाहेर गेल्यावर एक मोठा जनसमुदाय...एकच घोषणा करत होता…...

“फाशी द्या...फाशी द्या...त्या राज्याचा राजकुमाराला फाशी द्या...”

राजकुमारीने आपला एक हातवर करून सगळ्यांना शांत केले.

त्यातील एक जन पुढे येऊन बोलला... “नाही राजकुमारी तुम्ही जोपर्यंत या खुण्याला फाशी देत नाहीत तोपर्यंत आम्ही शांत बसणार नाही.

राजकुमारी, “हे पहा तुम्ही आधी शांत व्हा... तुमचा राग मी समजू शकते, पण यांनी नाही मारलं राजकुमारांना... हे काही अंशी

कारणीभूत असले तरी आपण यांना फाशीची शिक्षा देऊ शकत नाही...''

तोच व्यक्ति पुन्हा बोलला, ''हे त्या राज्याचे राजकुमार आहेत... आणि ते आपल्या राज्यात घुसले आहेत त्याबद्दल त्यांना फाशी द्या...''

''फाशी द्या...फाशी द्या...त्या राज्याचा राजकुमाराला फाशी द्या...'' पुन्हा लोकांचा एकच नारा सुरू होतो.

''शांत व्हा... हे पहा तुम्ही म्हणताय ते बरोबर आहे...पण आत्ता ते आपल्याला शरण आले आहेत... आणि आपण शरण आलेल्याला मृत्यू देत नाही.''

''मग यांना असंच सोडून द्यायचे... ''

''नाही... यांना शिक्षा होणार तुमच्यासमोर होणार... ती शिक्षा उद्या होणार आणि कोणती हे मी ठरवणार...'' राजकुमारीने तिरस्काराने भरलेला कटाक्ष रामवर टाकला.

''दरबारातील प्रधानाने पुढे येऊन मुजरा केला, ''राजकुमारी तोपर्यंत यांना कारागृहात ठेवायचं का…?''

''नाही... काही झालं तरी राजकुमारांनी यांना भाऊ मानलं होतं.….आपण या गोष्टीचा मान ठेवला पाहिजे.''

सगळे आपापल्या खोलीत गेले...त्याच रात्री राजकुमारी त्यांच्या खोलीत विचार करत होत्या... तेवढ्यात एक सेवक आला त्याने राजकुमारीला वाकून नमस्कार केला... " राजकुमारी राजमातोश्रींची तब्येत अचानक बिघडली आहे... राजवैद्यांनी तुम्हाला बोलावलं आहे."

**राजमातोश्रींच्या खोलीत**

राजकुमारी राजमातोश्रींच्या खोलीत पोहचल्या... राजमातोश्री मोठमोठ्याने श्वास घेत होत्या... राजकुमारी पलंगाच्या दुसऱ्या बाजुने राजमातोश्रींच्या जवळ गेल्या आणि त्यांचा हात हातात घेतला, "काय झालं राजवैद्य मातोश्री असं का करत आहेत."

"माहीत नाही राजकुमारी अचानक हे काय होतंय राजमातांना."

तेवढ्यात तिथे राम आणि जय आला.

जयने राजमातोश्रींना बघितले आणि तिथल्या एका सेवकाला त्याची बॅग आणायला सांगितली, त्यातील एक इंजेक्शन राजमातोश्रींना दिलं. थोड्यावेळातच त्यांची तब्येत स्थिर झाली...

जय तू इथेच थांब मी जातो असं म्हणत राम निघला. बाहेर जाणाऱ्या रामला थांबवत राजकुमारी बोलल्या, "राजकुमार राम

मला तुमच्याशी महत्त्वाचं बोलायच आहे, माझ्यामागे या...” राजकुमारी असं म्हणताच राम त्यांच्या पाठीमागून चालू लागला.

राजकुमारी एका खोलीत गेल्या,

खोलीत खूप अंधार होता. राम ईकडे तिकडे पाहू लागला त्याला काहिच दिसत नव्हतं, “कोणाची खोली आहे आणि इतका अंधार का आहे.“

“ते महत्त्वाचं नाही... आधी मी काय सांगते ते ऐका.”

बराच वेळ त्यांची चर्चा झाली.

“मी काय सांगितलंय ते लक्षात ठेवा.”

राम, “तुम्ही शब्द द्या की हे सगळं झाल्यावर तुम्ही मला युद्धात तुमच्या बाजुने लढायची परवानगी द्याल. “

“शब्द देते मी...” एवढं बोलून दोघेही तिथून निघून गेले.

**दुसरा दिवस उजाडला,**

सगळे लोकं राजमहलाबाहेर जमले होते... कारण हा न्यायनिवाडा प्रजेसमोर व्हावा ही राजकुमारींची इच्छा होती. तसे त्यांनी आधीच तयारी करण्याचे आदेश दिले होते. कारण लोकांना ही पहायचं होतं की राजकुमारी राजकुमारांच्या मृत्यूला जबाबदार असणाऱ्यांना काय शिक्षा देणार...

थोड्या वेळातच राजकुमारी तेथे हजर झाली, राजकुमारी येताच राजमंत्री बोलू लागले, "गुन्हेगारांना हजर करा."

राम आणि जयला बोलावताच हजर केले गेले.

राजकुमारी बोलू लागली, "मी तुम्हाला म्हटल्याप्रमाणे खूप विचार करून एक निर्णय घेतला आहे."

"कोणता निर्णय राजकुमारी...?" प्रधानजी.

"राजकुमार राम यांचं म्हणणं आहे की त्यांनी केलेल्या चुकीबद्दल आपण त्यांना माफकरून, येणाऱ्या युद्धात यांना सामील करून घ्यावं... पण माझा राजकुमार राम यांना एक प्रश्न आहे, ज्या व्यक्तिमुळे आमचे राजकुमार आमच्यात नाहीत, ज्या व्यक्तिमुळे आमच्या राज्याची सेनापती मेघना तिच्या जीवन मरणाशी खेळत आहेत अशा व्यक्तीवर आम्ही विश्वास कसा ठेवायचा.

राम, “मी तुमचा माझ्यावर विश्वास बसण्यासाठी कोणतीही परिक्षा द्यायला तयार आहे.”

राजकुमारी, “आपल्या सगळयांना हे माहिती आहे आपल्यासाठी किंवा त्या राज्यातील लोकांसाठी एकच गोष्ट प्राणप्रिय आहे...”

“कोणती..?” सगळे लोकं एकमेकांकडे बघत हाच प्रश्न विचारत होते.

राजकुमारी, “राज्यचिन्ह... हे जर खरंच बोलत असतील तर. यांना ते सिद्ध करावं लागेल……”

सगळे लोक एकमेकांकडे बघत होते, कोणालाच कळत नव्हतं राजकुमारी काय म्हणत होती.

सगळयांच्या तोंडावर जे प्रश्न दिसत होते त्याचं उत्तर देत राजकुमारी बोलली, “मला माहिती आहे तुम्हाला मी काय म्हणतं आहे ते कळत नाहीये, राज्यचिन्ह... म्हणजे आपल्या दंडावरील गोंदन जे आपले राज्याचं प्रतीक आहे आणि ते जितकं आपल्यासाठी महत्त्वाचं आहे... ते तितकंच त्या राज्यासाठी ही

आहे... म्हणून त्यांना त्यांच्या दंडावरील राज्यचिन्ह म्हणजेच गोंदलेले त्रिशूळ कायमचं काढावं लागेल...”

हे सगळं ऐकताच लोक एकमेकांकडे पाहू लागली आणि त्यांच्या चेहऱ्यावरच्या हावभावावरून हे स्पष्ट होतं की त्यांना तो निर्णय नुसता पटला नसून त्यांना त्यांच्या राजकुमारीचा अभिमान वाटत होता... आणि दोन मिनिटातच ते राजकुमारीचा जयघोष करू लागले... “राजकुमारी रोहिणी की जय……राजकुमारी रोहिणी की जय…… राजकुमारी रोहिणी की जय...”

पण त्यात असेही लोक होते जे नाराज होते, तर काही लोक रागाने लाल होत होते त्यातीलच एक माणूस बोलला, “ही लोक इतकी खालच्या थराला जातील अस वाटलं नव्हतं मला... या लोकांची हिंमतच कशी झाली असं काही करण्याची... मी जिवंत असेपर्यंत हे नाही होऊ देणार... आपल्या राज्याचा अपमान मी नाही सहन करणार...”

दुसऱ्या व्यक्तीने त्याला शांत करण्याचा प्रयत्न केला, “तू काही करणार नाही जिवा... इतक्या दिवसांची मेहनत वाया जाईल...”

त्याने त्याला शांत करण्याचा प्रयत्न केला पण त्याचा त्याच्यावर काहीच परिणाम झाला नाही.

इकडे राजकुमारी, “बोला राजकुमार राम ... मान्य आहे का?”

रामने थोडा विचार केला, “राजकुमारी मी तुम्हाला आधीच सांगितलं होतं, हा राजकुमार तेव्हाच मेला जेव्हा किशनने हे जग सोडलं... आणि आता तुमच्यासमोर फक्त राम उभा आहे आणि हे सिद्ध करण्यासाठी जर मला तुमची अट मान्य करावी लागणार असेल तर मला मान्य आहे...”

जय, “राम हे काय करतोय तू... तू राजकुमार आहेस त्या राज्याचा... आणि तू जर हे केलं तर तो तुझ्या जन्मभुमीचा अपमान होईल...”

“खरंतर दादासाहेबांनी ज्या पद्धतीने किशनला मारलं तेव्हाच आमच्या जन्मभुमीचा अपमान झाला होता...”

“ते जे वागले ते चुकीच होतं पण तू जे करत आहे तेही बरोबर नाही...राम.”

“मला माहीत आहे पण... मला स्वतःला सिद्ध करण्यासाठी जर हे करावं लागणार असेल तर मी हे देखील करेल.”

राजकुमारी, “शिक्षेची अंमलबजावणी करा राजमंत्री.”

दोन माणसांनी पुढे येऊन रामला धरायचा प्रयत्न केला, पण रामने त्यांना हात दाखवून लांब थांबायला सांगितले व आपला हात पुढे केला.

तेवढ्यात एक जण पुढे आला त्याने हातात काहीतरी आणले होते जे त्याने रामच्या दंडावर लावले आणि दंडावरचे गोंदलेले त्रिशूळ जे रामने लपवले होते, ते त्रिशूळ दिसायला लागले आणि आता त्याने ते काढायला सुरुवात केली, ते काढत असताना रामला खूप त्रास होत होता आणि त्याने तो सहण ही केला. पण त्यापेक्षाही कितीतरी पटीने जास्त त्रास त्याच्या मनाला होत होता.

इकडे लोकांच्या घोळक्यात उभा असणारा जिवा ऐकायलाच तैयार नव्हता, अखेर त्याचा बांध फुटला......

जिवाने हातात तलवार घेतली आणि बोलला, “थांबा ये घुबडांनो...तुमची हिंमतच कशी झाली आमच्या राज्याचा अपमान करायची...... हिंमत असेल तर माझ्याशी दोन हात करा...”

अचानक असा आवाज आल्यावर सगळे दचकले कोन होता तो, हे कोणालाच कळत नव्हतं.

“पकडा त्याला...” सरसेनापतीने आदेश दिला तेव्हा काही सेवक त्याला पकडण्यासाठी साठी पुढे गेले.

पण जिवाच्या एका एका वाराने सगळे जमिनीवर कोसळले.

जिवाने “आक्रमण...” असे म्हणताच एक आश्चर्य घडलं घोळक्यातून एक दोन नव्हे तर ४००-५०० तलवारीचे हात वर आले.

सरसेनापतींने अजून काही सेवक पाठवले पण त्या घोळक्यात असणाऱ्या शिवनगरीच्या सैनिकांपुढे विष्णुनगरीच्या १००-२०० सैनिकांचं काहीच चाललं नाही. आणि हे सगळं पाहून विष्णुनगरीच्या लोकांचे डोळे पांढरे पडले.

आत्तापर्यंत सगळ्यांना हे कळून चुकलं होतं की त्या शिवनगरीच्या लोकांनी विष्णुनगरीत घुसखोरी केली होती... पण आता काय करणार जनतेचं रक्षण कसं करणार... सोबतीला आणलेले १००-२०० रक्षक तर केव्हाच खाली पडले होते...

इकडे ४-५ सेवकांनी आणि सरसेनापतींनी राजकुमारी भोवती वेढा घातला होता त्यांच रक्षण करण्यासाठी...

सरसेनापती, “राजकुमारी तुम्ही लगेच महालात जायला निघा... आम्ही इकडे पाहतो काय करायचं ते...”

राजकुमारी, “सरसेनापती मामा आधी तुम्ही शांत व्हा आणि एकदा समोर बघा...”

सरसेनापतींना राजकुमारीच्या तोंडावरचा आनंद बघून काहीच कळले नाही मग त्यांनी मागे वळून बघितलं तर एक वेगळच आश्चर्य घडलं...... समोरून अजून १०००-१५०० तलवारी बाहेर निघाल्या.

“राजकुमारी हे काय आहे...”

“अजून तुम्हाला नाही समजलं, अहो हे आपले सैनिक आहेत जे आमच्या आदेशानुसार आधीच आपल्या जनतेमध्ये मिसळले होते. आणि मला असं वाटतं आपले सैनिक सरसेनापतींच्या आदेशाची वाट बघत आहेत...”

सरसेनापतींनी एक स्माईल दिली, “नक्कीच राजकुमारी...”

“हो मग वाट कसली बघताय...”

“आक्रमण... एकाला ही जिवंत सोडू नका...”

“नाही सरसेनापती आपल्याला सगळे जिवंतच हवे आहेत...”

“जशी आज्ञा राजकुमारी...”

सगळे मंत्री राजकुमारीकडे आश्चर्याने बघत होते. थोड्यावेळातच विष्णुनगरीच्या सैनिकांनी शिवनगरीतून आलेल्या लोकांना बंदी बनवले.

काही वेळानंतर राजसभा भरवली गेली.

राजमंत्री, "हे कसं केलं राजकुमारी...? सगळ्यांना हाच प्रश्न पडला आहे."

राजकुमारी, "सांगते... काल राजकुमार राम यांनी त्यांच सत्य सांगितले आणि पाच मिनिटातच प्रजा बाहेर जमा झाली, त्यांना मारून टाकण्यासाठी घोषणा करू लागली... तेव्हाच आमच्या मनात संशय आला की नक्कीच काहीतरी गडबड आहे म्हणून आम्ही राजकुमार राम यांच्याशी या विषयावर बोललो..."

तेवढ्यात राम बोलू लागला, "मला माहीत होतं मी येथे आल्यामुळे दादासाहेबांच्या युद्ध जिंकण्याचा स्वप्नात मी मोठा काटा आहे आणि तो काटा काढण्यासाठी ते काहीही करू शकतात...... लोकांचं असं अचानक येणं आणि मला फाशी द्या म्हणणं म्हणजे......"

रामच बोलणं मध्येच थांबवत राजकुमारी बोलू लागल्या, “म्हणजे कोणीतरी नक्कीच आहे जे त्या राज्यातील असून इथे राहत आहे आणि आपल्या लोकांना भडकवत आहे. म्हणून मी राजकुमार राम यांच्या मदतीने नियोजन केले... आणि तसंच झालं... आणि रामने त्यांच्या दंडावरील त्रिशूळ काढून हे ही सिद्ध केलं की खरंच ते इथे आपली मदत करायला आले आहेत...”

राजदरबार संपताच राजकुमारीने राम आणि जयला थांबवून बाकिच्यांना जाण्याचे आदेश दिले.

राजकुमारी, “राजकुमार राम तुमचे मनापासून धन्यवाद... तुम्ही मदत नसती केली तर मी कधीच राज्यात घुसलेल्या शत्रुला पकडू शकले नसते... खूप खूप धन्यवाद...”

जय मात्र खूप रागात होता त्याला त्याच्या मित्राचा त्रास बघवत नव्हता... “आता काय उपयोग तुमच्या धन्यवाद म्हणण्याचा... तुमचा फायदा तर झाला, पण माझ्या मित्राला जो त्रास झाला त्याचं काय... त्याच्या हातावरचं ते मानचिन्ह त्रिशूळ काढून तुम्ही त्याला फक्त शारीरिक नाही तर मानसिक त्रास सुद्धा दिला आहे, यावर तुमचं काय म्हणणं आहे बोला...”

रामने त्याला शांत करायचा प्रयत्न केला पण त्याचा काही उपयोग झाला नाही जय रागात तिथून निघून गेला...

राम, "राजकुमारी त्याला माफ करा, माझ्यावर जरा जास्तच प्रेम करतो."

"काही हरकत नाही, मी तुम्हाला शब्द दिल्याप्रमाणे तुम्ही युद्धात आम्हाला मदत करू शकता..."

जयचं बोलणं खरं होतं राम त्याला झालेलं दुःख लपवायचा जो काही प्रयत्न करत होता तो राजकुमारींच्या लक्षात येत होता पण त्या काहीही बोलल्या नाहीत.

"राजकुमारी, राजकुमारी कसला विचार करताय..."

"हं... काही नाही, तुम्ही काही म्हणालात का...?"

"मी म्हणालो, मी जयकडे जातो त्याला समजावतो. तुम्ही नका त्याचा बोलण्याचा विचार करू."

"ठीक आहे..."

तो जायला निघणार तेवढ्यात त्याच्या लक्षात आलं, "अरे यार मी हे कस विसरलो..."

"काय झालं...?"

“मेघनाच्या औषधाची वेळ झाली... आणि मी... आता काय करू...” विचार करत.

“मी काय म्हणते... तुम्ही जा मेघनाकडे मी बोलते तुमच्या मित्राशी...”

“धन्यवाद राजकुमारी”

त्यानंतर राजकुमारी जयला महालात शोधू लागल्या, पण त्यांना तो कुठेच दिसला नाही... मग न राहून त्यांनी एका सेवकाला विचारले...

सेवक, “डॉक्टर बाहेर बागेत आहेत.”

त्या बाहेर बागेत गेल्या, जयकडे बघून त्याचा राग थोडा ही कमी झालाय असं त्यांना वाटल नाही. जयला पावलांचा आवाज येताच तो मागे वळाला. “राजकुमारी तुम्ही इथे...”

“मला जरा तुमच्याशी बोलायचं आहे...” राजकुमारी.

“काही नवीन प्लॅन आहे का तुमचा... रामला त्रास द्यायचा... तसं असेल तर सांगा...तो ते ही करेल तुमचा आमच्यावर विश्वास बसण्यासाठी...तो त्याचा जीव ही देईल आणि त्याच्यासाठी मी माझा…”

तेवढ्यात राजकुमारी थोडंसं जवळ येऊन बोलल्या, “तुमचं बोलून झालं असेल तर मी बोलू... ”

जय, “बोला...”

“पहिलं तर धन्यवाद तुम्ही मातोश्रींचा जीव वाचवला आणि माफी की मी उशीर केला आभार मानायला...”

“काही हरकत नाही, आणि दुसरं काय...?”

“दुसरं हे की तुमच्या मित्राच्या दंडावरचे गोंदलेले त्रिशूळ आहे तसं आहे ते काढलेलं नाही...”

“काय... काय म्हणाला...” जय आश्चर्याने राजकुमारीकडे बघत होता.

“तुम्ही जे ऐकले ते... ते फक्त एक नाटक होतं.”

“हे रामला माहिती आहे...”

“नाही, ही देखील एक तपासणी होती असं समजा...”

जयने आनंदाच्या भरात राजकुमारीला मिठी मारली, “thank you… thank you so much”

जयच्या लक्षात आलं की आपण राजकुमारीला मिठी मारली आहे तो पटकन बाजूला झाला. ”Sorry राजकुमारी ते...” तो बोलताना थोडा अडखळतो...

“It’s ok...I am fine…”

“तुम्हाला इंग्लिश येत...!” जयने आश्चर्याने विचारले.

“हो आणि फक्त इंग्लिश नाही अजून बऱ्याच भाषा बोलता येतात मला ... पण आत्ता ते महत्त्वाचं नाही आधी तुमच्या मित्राला सांगा... नाहीतर त्यांना वाटेल की त्यांनी खूप मोठा गुन्हा केला आहे.”

“thank you, thank you so much... मी आत्ता जातो.”

“आणि हो त्यांना सांगा उद्यापासून युद्धाची तयारी करायची आहे... फक्त एक आठवडा शिल्लक आहे.”

सांगतो म्हणून जय पळत रामकडे गेला.

इकडे राम मात्र दुःखी होता आणि बेडवर निपचित पडलेल्या मेघनाशी बोलत होता...

“आज खूप अस्वस्थ वाटत आहे मेघना, मी तुझ्याबरोबर आणि किशनबरोबर खूप वाईट वागलो आणि त्याच प्रायश्चित्त म्हणून मी हे सगळं करत आहे...पण काही झालं तरी ते माझं राज्य आहे आणि मी मानचिन्ह काढून राज्याचा अपमान केला आहे... हे मला सहन होत नाही मेघना...”

तेवढ्यात जय तेथे आला व त्याला सगळं काही सांगितलं दोघांनीही आनंदाने एकमेकांना मिठी मारली.

दोन्ही राज्यांत युद्धाची तयारी सुरू झाली.

## इकडे शिवनगरीत

राजा आदित्यला राजदरबारात खबरीकडून सगळं काही समजलं तसा तो रागात सिंहासनावरून उठला... त्याच्या रागाने लाल झालेल्या चेहऱ्याकडे बघून सगळेच घाबरले.

त्यातुनही त्यांच्यातील एका मंत्र्याने म्हणजे शिवनगरीच्या प्रधानाने पुढे येऊन बोलण्याची हिंमत केली, "या सगळ्यावर तुमचं काय म्हणणं आहे महाराज... तुम्ही जिवाने केलेल्या मुर्खपणामुळे त्याच्यावर नाराज झाला का...?"

"हे काय म्हणाला तुम्ही प्रधानजी नाराज आम्ही आणि जिवावर मुळीच नाही...अहो त्याने तर आपल्या मातृभुमीची इज्जत राखली, आम्हाला तर अभिमान वाटतो त्याचा..."

सगळे एकमेकांकडे बघू लागले, प्रत्येकाच्या मनात हाच प्रश्न होता की मग राजांच्या चिडण्यामागचं कारण काय...

सगळयांच्या मनातला प्रश्न प्रधानजींनी राजांना विचारला.

“प्रधानजी वाईट या गोष्टीच कमी वाटतंय की इतक्या वर्षांची मेहनत वाया गेली...पण ती राजकुमारांमुळे गेली याचंच जास्त वाईट वाटतंय. आणि याची शिक्षा त्यांना भोगावीच लागणार...”

“राजे... ते छोटे बंधू आहेत आपले, राजकुमार आहेत या राज्याचे...”

“नाही प्रधानजी मलाही हेच वाटलं होतं की ते नाराज आहेत आमच्यावर काही दिवसांनी होतील शांत आणि येतील आपल्या घरी पण नाही आम्ही चुकीचे होतो, ह्या घडलेल्या प्रसंगावरुन हे निश्चित आहे त्यांना ना आमची कदर आहे ना राज्याची आणि असा माणूस आमच्यासाठी जगला काय किंवा...” असं म्हणत ते तिथून निघून गेले. त्यांच वाक्य तर अपूर्ण होतं पण त्याचा अर्थ तिथे उपस्थित सगळ्यांनाच समजला होता.

दोन्ही राज्यांत युद्धाची तयारी झालेली होती, शिवनगरीकडे असलेले सैन्य हे विष्णुनगरीपेक्षा जास्त होते. पण राजकुमारीच्या बुद्धीपुढे आणि रामच्या शक्तीपुढे त्यांचा टिकाव लागणे निव्वळ अशक्य आणि झालंही तेच, विष्णुनगरी युद्ध जिंकली.

युद्ध संपले विष्णुनगरीत सगळीकडे आनंदाचे वातावरण होते... प्रत्येकजण आपला आनंद आपापल्यापरीने साजरा करत होतं... कोणी गोडधोड करून तर कोणी गाण म्हणून तर कोणी त्या गाण्याच्या तालावर नाच करून...

राम युद्धावरून परत येताच मेघनाच्या रूममध्ये गेला, पण तिच्या स्थितीत अजून काहीच फरक पडलेला नव्हता हे बघून तो हळवा झाला, त्याचे डोळे पाण्याने भरून आले... त्याने दोन्ही हातांनी डोळे पुसले आणि तो मेघनाशेजारी जाऊन बसला.

"मेघना ऐकलंस तू आपण युद्ध जिंकलो... मला माहीत आहे मी तुझ्यासोबत आणि किशनसोबत जे काही वागलो त्यानंतर मला माफ करणं हे खूप कठीण आहे पण राजकुमारी आणि राजमातोश्रींने मला माफ केलं... माझ्या मनावरचं खूप मोठं ओझं कमी झालं ... आता फक्त तुझ्या माफीची वाट बघतोय मेघना..."

त्याच लक्ष दरवाज्याबाहेर उभ्या असणाऱ्या जयकडे गेलं, "अरे जय आत ये बाहेर का उभा आहेस"

"मी मेघनाला चेक करण्यासाठी आलो होतो पण तू बोलत होतास म्हणून बाहेर थांबलो होतो."

“अरे आधी का नाही सांगायचं माझं काय चालूच राहील, तू चेक कर”

जयने मेघनाला चेक केलं...

रामने खूप आशेने जयकडे बघितले... जयला त्याचा प्रश्न कळला पण त्याचं उत्तर त्याच्याकडे नव्हतं... आणि जयचा पडलेला चेहरा बघून रामला त्याच्या प्रश्नाचे उत्तर मिळालं...

“सोहम... सोहम... झोपला की काय...?”

“नाही पप्पा, पुढे सांगाना काय झालं”

“अरे गोष्ट संपली...”

सोहम जो पप्पांच्या मांडीवर डोके ठेवून गोष्ट ऐकत होता तो लगेच ताडकन उठून बसला, “अशी कशी संपली गोष्ट, विष्णुनगरी युद्ध जिंकल्यावर शिवनगरीचं काय झालं...?, राजकुमारीचं पुढे काय झालं... ?, राजा आदित्य कुठे गेला... ?, राम आणि मेघनाचे काय झालं, मेघना कोमातून बाहेर आली तिने रामला माफ केलं...” सांगा ना पप्पा.

“अरे सांगतो मी तुझं लक्ष आहे की नाही ते पाहत होतो...”

“पप्पा तुम्ही पण ना, सांगाना पुढे काय झालं...”

“अरे पुढे काय होणार राजकुमार कृष्णांच्या इच्छेनुसार राजकुमारीने दोन्ही राज्ये शासनाच्या हवाली केली. त्यानंतर राज्यातील एक एक करत बरीचशी घरे बाहेरील जगात आपापल्या सोयीनुसार स्थलांतरित झाली...पण त्यांच्या मनातील एकमेकांबद्दल असलेला राग कमी झाला नाही... आणि म्हणूनच त्यांनी आपल्या पुढच्या पिढीला हे सगळं माहीत असलं पाहिजे म्हणून ही टॅटू काढायची परंपरा आणि कथा चालू ठेवली.”

“आणि पुढे...”

“पुढे अजून काय संपली गोष्ट...”

“राजकुमारी रोहिणीचं पुढे काय झालं आणि राजा आदित्यने त्यांनंतर काहीच केलं नाही... आणि महत्त्वाचं मेघनाचं काय झालं, ती शुद्धीवर आली तिने रामला माफ केलं... सांगाना पप्पा...”

“माहीत नाही... आता प्रश्न विचारणं बंद कर आणि झोप...”

अशोक सोहमला झोपवून बाहेर आला त्याला रूमबाहेरच उभी असलेली माधुरी दिसली, “तू इथे का थांबली आहेस”

“तुम्ही आधी मला सांगा तुम्ही सोहमशी खोटं का बोलत होता...?”

“तू आधी आपल्या रुममध्ये चल...” एवढं म्हणून अशोकने माधुरीचा हात धरून तो तिला त्यांच्या रूममध्ये घेऊन गेला.

“हा आता बोल काय खोट बोललो मी...”

“हे की राजकुमारीने दोन्ही राज्ये शासनाच्या हवाली केली आणि तुम्हाला माहीत नाही त्या दुष्ट आदित्यने काय केलं आणि राजकुमारी रोहिणी, मेघना आणि राम यांचं पुढे काय झालं ते...”

“मला सगळं माहीत आहे, पण मी त्याला हे सगळं आत्ता सांगू शकत नाही कारण तो अजून लहान आहे, त्याला जर आपण आत्ता हे सगळं सांगितलं तर तो कसा रिॲक्ट करेल आणि त्याच्या नाजूक मनावर याचा काय परिणाम होईल सांगता येत नाही...”

“मग त्याला हे कधीच कळणार नाही... की त्याच्या पुर्वजांसोबत काय घडलं... आणि सगळ्यात महत्त्वाचं त्याच्यावर किती मोठी जबाबदारी आहे ते...”

“कळेल, पण योग्य वेळ आल्यावर... तोपर्यंत आपण फक्त वाट बघायची...”

-------------------*****--------------------

The end

साहित्य म्हणजे असतं काय?

जीवनाचे अनुभव असतात, कधी खरे तर कधी खोटे वाटतील इतके खरे.

जीवनमूल्यांचे आदर्श असतात, कधी सोपे, कधी अवघड. कधी अशक्यप्राय.

जगण्याच्या चढ उतारांचे आरसे असतात. कधी अनुभवलेले. कधी न ऐकलेले.

आपल्या मनाचा, आपल्या जीवनाचा आरसा असतो साहित्य.

साहित्यात रमू या.

साहित्यात रमणारा समाज अधिक सुसंस्कृत, अधिक प्रगतीशील असतो.

प्रगती म्हणजे केवळ समृद्धी नाही ना!

ई साहित्य प्रतिष्ठान.

मराठी साहित्यातील एक कोवळे पान.

एक प्रसन्न अनुभव

www. esahity. in

www. esahity. com

esahity@gmail. com